रविवार, २४ एप्रिल २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २७६
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## पाकिस्तानमधील डिग्री भारतात ठरणार अवैध–यूजीसी



**दिल्ली** : भारतीय विद्यार्थी आणि परदेशी विद्यार्थ्यांनी पाकिस्तानातील शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेतल्यास ते भारतात उच्च शिक्षण आणि नोकरीसाठी पात्र ठरणार नाही, असे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) स्पष्ट केले आहे. चीनमधील विद्यापीठांतून ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केलेली पदवी भारतात ग्राह्य धरली जाणार नसल्याचे यूजीसी आणि एआयसीटीई यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केले होते. त्यानंतर आता पाकिस्तानमधील सर्वच अभ्यासक्रमांबाबतचे स्पष्टीकरण संयुक्त परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहे. स्थलांतरित नागरिकांनी पाकिस्तानातील शिक्षण संस्थेतून पदवी मिळवली असल्यास आणि त्यांना भारताचे नागरिकत्त्व असल्यास केंद्रीय गृहमंत्रालयाकडून सुरक्षेसंदर्भातील पूर्तता केल्यानंतर ते पात्र ठरू शकतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## अंतरंग

तापलेल्या वातावरणात पक्षीही व्याकूळ/२

महावितरणचा वीज ग्राहकांना 'शॉक'/३

बोरगावाजवळ कालव्यात आढळला मृतदेह/७

### संजय राऊतांची खासदार नवनीत आणि आमदार रवी राणा यांना धमकी

# राणा दाम्पत्याला पोलिसांकडून अटक

### आंदोलन स्थगित केल्यानंतरही कारवाई



**मुंबई : प्रतिनिधी**

'मातोश्री'वर हनुमान चालिसाचे पठण करणार असे खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांनी सांगितल्यामुळे राज्यातील वातावरण तापले होते. मात्र हेच आंदोलन राणा दाम्पत्याने स्थगित केल्यानंतरही शनिवारी (दि. २३) सायंकाळी खार पोलिसांनी खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांना अटक केली आहे. त्यांच्यावर कलम १५३ (अ) नुसार गुन्हा दाखल केल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान शिवसेना खासदार संजय राऊत यांनी राणा दाम्पत्याला प्रसार माध्यमांसमोरच धमकावल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी नवनीत राणा यांनी केली आहे.

नवनीत राणा आणि रवी राणा यांना अटक केल्यानंतर त्याचे पडसाद राज्यभर उमटल्याचे पाहायला मिळत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्यात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी आम्ही आमचे आंदोलन स्थगित करीत असल्याची घोषणा रवी राणा आणि नवनित राणा यांनी शनिवारी दुपारी केली. **(पान २ वर..)**

### 'मुख्यमंत्र्यांच्या आदेशानेच आमच्यावर हल्ला'

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना आदेश दिले असल्यानेच आमच्या कार्यकर्त्यांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप खासदार नवनीत राणा यांनी या वेळी केला. आमच्या घराबाहेर एवढा पोलीस बंदोबस्त असतानाही कार्यकर्ते बॅरिकेड्स तोडून आत कसे आले? असा सवाल उपस्थित करून पोलिसांनी आम्हाला जबरदस्तीने पोलीस ठाण्यात आणले, असाही आरोप त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना असा कोणताही प्रकार राज्यात घडला नाही मात्र आता राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे तिनतेरा वाजले असल्याचेही त्या म्हणाल्या.

(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..




### आमदार प्रशांत ठाकूर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन

# क्रीडा क्षेत्राला महत्त्व देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले

■ विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्रातील कबड्डी व कुस्तीच्या खेळाडूंना त्यांच्या उन्नतीसाठी राज्य सरकारकडून ताकद मिळणे अत्यंत गरजेचे आहे, परंतु महाविकास आघाडी सरकारमध्येच हुतूतू सुरू आहे. त्यामुळे त्यांना इतरांकडे लक्ष देण्यास वेळ नाही. अशा वेळी क्रीडा क्षेत्राला महत्त्व देण्याचे काम खऱ्या अर्थाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आहे. वेगवेगळ्या क्रीडापटूंना मदत देऊन त्यांना घडविण्याचे काम केले आहे, असे गौरवोद्गार विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी धरणा कॅम्प येथे केली.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने जय भवानी नवतरुण मंडळाच्या वतीने २२ ते २४ एप्रिलपर्यंत आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा धरणा कॅम्प येथे आयोजित करण्यात आली असून स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. **(पान २ वर..)**

## संजय राऊतांना आम्ही गांभीर्याने घेत नाही

■ विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांचा टोला

**गडचिरोली : प्रतिनिधी**



गेल्या दोन दिवसांपासून मुंबईत मातोश्रीबाहेर हनुमान चालीसा पठण करू या राणा दाम्पत्यानं दिलेल्या इशाऱ्यावरून मोठा वाद सुरू आहे. आज नवनीत राणा आणि रवी राणा यांनी दुपारी माध्यमांशी बोलताना मातोश्रीवर जाणार नसल्याचं जाहीर केल्यानंतर त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊतांनी पत्रकार परिषद घेत या सगळ्याच्या मागे भाजपा असल्याचा आरोप केला. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी खोचक शब्दांत निशाणा साधला आहे.

राणा दाम्पत्यानं आंदोलन संपवत असल्याचं जाहीर केल्यानंतर संजय राऊतांनी पत्रकार परिषदेतून भाजपावर निशाणा साधला होता. हे प्रकरण आम्ही मोठं केलेलं नाही. तर कालपर्यंत हिंदुत्वावर हल्ले करणारे बंटी आणि बबली किंवा इतर काही नवहिंदुत्ववादी ओवेसी आले आहेत त्यांना मोठं करण्याचे काम भाजपा करत आहे. पण त्यामध्ये त्यांचेच हात पोळणार आहेत. पश्चिम बंगालमध्ये त्यांना ममता बॅनर्जी पुरून उरल्या आहेत. केरळमध्ये त्यांना श्वासही घेता येत नाही. महाराष्ट्रामध्ये शिवसेनेला पुरुन उरण्यासाठी त्यांना सात जन्म घ्यावे लागतील, असं संजय राऊत म्हणाले. यासंदर्भात बोलताना आता देवेंद्र फडणवीसांनी टोला लगावला आहे.

## ... तर सगळ्या भानगडी बाहेर काढीन

**ना. नारायण राणेंचा संजय राऊतांना इशारा**



**मुंबई : प्रतिनिधी**

खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा जोपर्यंत माफी मागत नाही तोपर्यंत त्यांना बाहेर पडू देणार नाही असा इशारा शिवसैनिकांनी दिला आहे. या वादात आता केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीही उडी घेतली असून त्यांनी संजय राऊत यांना आव्हान दिले आहे.

संजय राऊत राज्यसभेत खासदार म्हणून जात असताना मतदारयादीत नाव होते का? असा प्रश्न त्यांना विचारा. त्यावेळी मी त्यांच्या बरोबर होतो. तुमच्या भानगडी मी बाहेर काढीन. बाळासाहेबांच्या सांगण्यावरुन मी तुम्हाला खासदार बनवले. मी त्यांना सोबत घेऊन गेलो आणि फॉर्म भरला. आक्षेप घेतल्यानंतर मी सांभाळून घेतले. तेव्हा ते खासदार झाले. फॉर्म भरताना खोटी कागदपत्रे सादर केलीत, असा आरोप नारायण राणे यांनी केला.

## निवडक

### 'खालिदचे भाषण आक्षेपार्हच'

**नवी दिल्ली :** विद्यार्थी नेता उमर खालिद याने फेब्रुवारी २०२० मध्ये अमरावतीमध्ये केलेले भाषण हे अवमानकारक, क्लेशदायी असल्याचे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे. ईशान्य दिल्लीतील दंगलीचा कट रचल्याप्रकरणी खालिदच्याविरुद्ध दाखल केलेल्या आरोपपत्रातील खालिदचे वकील त्रिदीप पैस यांनी वाचून दाखविले. भाषणस्वातंत्र्याबद्दल आम्हाला काही म्हणायचे नाही, पण तुम्ही काय बोलत आहात, या शब्दांत न्यायालयाने आपली नाराजी व्यक्त केली.

### अमेरिकेचा चीनला पुन्हा इशारा

**वॉशिंग्टन :** रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाच्या अनुषंगाने अमेरिकेने चीनला पुन्हा एकदा निर्बंधांचा इशारा देण्याबरोबरच भारताचे रशियावरील शस्त्र अवलंबित्व संपवण्यासाठी मदतीची ग्वाही गुरुवारी दिली. चीनने कोणत्याही स्वरूपात रशियाला युद्धात मदत केल्यास त्या देशावर आणखी आर्थिक निर्बंध लादण्यात येतील, असा इशारा अमेरिकेने दिला आहे.

## महाड शिरगाव आदिवासीवाडीवर घराची भिंत कोसळली

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यात गेले काही दिवस पावसाचे चिन्ह दिसून येत होते. बदललेल्या तापमानामुळे शुक्रवारी सायंकाळी अचानक ढग दाटून आले आणि तालुक्यातील काही भागात पाऊस तर काही भागात वादळी वाऱ्याने नुकसान केले. या वादळी वाऱ्यामुळे शहराजवळ असलेल्या शिरगाव आदिवासीवाडी येथे एका घराची भिंत कोसळली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### सुदैवाने जीवितहानी नाही



तालुक्यात गेली काही दिवस सातत्याने बदलणाऱ्या तापमानामुळे सर्वच हैराण झाले आहे. शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी जोरात वादळी वारा आणि पाऊस आल्याने अनेकांची पळापळ झाली. ऐन खरेदीच्या वेळेतच अचानक उठलेल्या वादळाने वातावरणात प्रचंड धूळ निर्माण झाली. या धुळीने आणि वाऱ्याबरोबर आलेल्या कचऱ्याने अनेकांना त्रास झाला. तालुक्यातील आणि शहरातील कांही भागात पाऊस पडला. बिरवाडी विभागात तसेच किल्ले रायगड भागात पाऊस पडला.

शहराजवळ असलेल्या शिरगाव आदिवासीवाडीवरील संतोष पवार याच्या घरकुलाची एक भिंत कोसळली. बाहेर सुरु असलेल्या वादळातच भिंत कोसळल्याने घरात असलेल्या पवार कुटुंबाचे मोठे हाल झाले. घरातील सामानाचे नुकसान झाले आहे. या पावसामुळे आंबा, करवंद, आदी रानटी फळे धोक्यात आली आहेत.

## कुठे उष्मा, तर कुठे पाऊस!

**हवामान विभागाचा अंदाज**

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यामध्ये पुढचे दोन दिवस काही ठिकाणी गारपीटीसह पाऊस तर काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

पुढचे दोन दिवस राज्यातल्या काही भागांमध्ये गडगडाटासह हलक्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सातारा आणि सांगली या दोन्ही जिल्ह्यांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे, तर काही ठिकाणी गारपिटीची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

यानंतर काही दिवस काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्वच नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.





**पनवेल : खारघर सेक्टर १४ मधील प्लॉट नंबर १४ हा भूखंड सिडकोने महापालिकेला हस्तांतरीत केला आहे. या भूखंडावर महापालिकेच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांसाठी मच्छीमार्केट, भाजीमार्केट उभारण्यात येणार आहे. या भूखंडाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी पाहणी केली. या वेळी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील तसेच वासुदेव पाटील उपस्थित होते.**

## अवकाळी पावसाने पुण्यात घेतले तीन बळी

**पुणे : प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस आणि जोरदार वारा यामुळे वडाचे झाड पडून तिघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पुरंदर येथील सासवड–वीर मार्गावर घडली. या अपघातात नवविवाहित जोडप्यासह लहान भाचीचा मृत्यू झाला.



मृत्यू झालेल्या दांपत्याचे नुकतेच लग्न झाले होते. शुक्रवारी (दि. २२) जोरदार वाऱ्यासह पाऊस पडला. या वेळी पावसामुळे वडाचे झाड अंगावर पडल्याने रेणुकेश जाधव आणि त्यांची पत्नी सारिका जाधव यांचा मृत्यू झाला तर सोबत असलेल्या सात वर्षांची भाची ईश्वरी देशमुख हिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला.

मृत्यू झालेल्या ईश्वरीचा शुक्रवारी वाढदिवस होता तर रेणुकेश आणि सारिका यांचा नुकताच विवाह झाला होता. या नवदाम्पत्याच्या मृत्यूची बातमी समजताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे राज्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली



पनवेल नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष

**जानूशेठ कानाशेठ म्हात्रे**

यांचे मंगळवार, दि. १२ एप्रिल २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**तेरावा विधी**

रविवार, दि. २४ एप्रिल २०२२ रोजी राहत्या घरी होणार आहे.

**शोकाकूल**

| | |
|---|---|
| बाळकृष्ण जानू म्हात्रे | दीपक गुरुनाथ म्हात्रे |
| मनोहर जानू म्हात्रे | राजू गुरुनाथ म्हात्रे |
| गुरुनाथ काना म्हात्रे | विनायक अंबाजी म्हात्रे |
| अंबाजी काना म्हात्रे | हरेश अंबाजी म्हात्रे |
| रामभाऊ माया म्हात्रे | हर्षल बाळकृष्ण म्हात्रे |
| किशोर बबन म्हात्रे | मंदार बाळकृष्ण म्हात्रे |
| चंद्रकांत बबन म्हात्रे | निरांत परशुराम म्हात्रे |
| महेंद्र बबन म्हात्रे | सिद्धार्थ मनोहर म्हात्रे |

गिरीश गुरुनाथ म्हात्रे

**समस्त म्हात्रे परिवार, धाकटा खांदा**
(ता. पनवेल)

टीप : मामाशिवाय कुणीही दुखवटा आणू नये.

# राज्यातील कायदा सुव्यवस्था पूर्ण बिघडली : चंद्रकांत पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकार एकीकडे सत्तेच्या माध्यमातून दादागिरी व दडपशाही करत असतानाच दुसरीकडे सत्ताधारी आघाडीला विरोध करणाऱ्यांवर दबाव आणण्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरवत आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था स्थिती पूर्ण बिघडली असून भारतीय जनता पक्ष त्याबद्दल चिंता व्यक्त करुन निषेध करत असल्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.



चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, मुख्यमंत्र्यांच्या मातोश्री या निवासस्थानाबाहेर भाजपा कार्यकर्ते मोहित कंबोज यांच्या गाडीवर काल रात्री तीनशे ते चारशे जणांच्या जमावाने हल्ला केला. त्या आधी भाजपाच्या मुंबईतील पोलखोल यात्रेच्या रथाची मोडतोड करण्यात आली व हल्लेखोर सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते असल्याचे आढळले. खा. नवनीत राणा व आमदार रवी राणा हे मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर हनुमान चालिसा म्हणण्यास निघाले तर त्यांच्या मुंबईतील घराबाहेर सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना रोखले. राज्यात हुकुमशाही आली का, आणीबाणी लागू झाली का, असे प्रश्न पडण्यासारखी स्थिती सध्या आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती पूर्ण बिघडली आहे. पाटील पुढे म्हणाले, हनुमान चालिसा म्हणण्यात विरोध करण्यासारखे काय आहे? एखादी व्यक्ती आपल्या घराबाहेर हनुमान चालिसा म्हणण्यास येत असेल तर मुख्यमंत्र्यांनी त्याला मानाने घरात बोलावावे. तसे नको असेल तर रोखण्यासाठी पोलिसांना बोलवावे. परंतु सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरविणे हे अनाकलनीय असल्याचेही ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या संरक्षणात पोलीस कमी पडले का, त्यांना राज्य चालविता येत नाही का, असे प्रश्न यातून निर्माण होतात अशाही टीका पाटील यांनी केली आहे.

**आताच लोडशेडिंग का?**

**राज्यात कृत्रिम वीज टंचाई निर्माण करून लोडशेडिंग केले जात आहे. त्यामुळे लोकांचे प्रचंड हाल होत आहेत. पाणी उपलब्ध असून शेतकरी ते पिकांना देऊ शकत नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार होते त्यावेळी पाच वर्षे राज्यात लोडशेडिंग बंद होते. पण आता लोडशेडिंगचे कृत्रिम संकट आणले आहे. भाजपा हे सहन करणार नाही. याच्या विरोधात आम्ही आंदोलन करत आहोत.**

## राऊतांविरोधात गुन्हा दाखल करा
## मनसेची नागपूर पोलिसांकडे मागणी

**नागपूर:रामप्रहर वृत्त**



गुढीपाडव्याच्या मेळाव्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी घेतलेल्या हिंदुत्ववादी भूमिकेबरोबरच महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडल्यापासून महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून आरोप सुरू झाले आहेत. राज ठाकरेंनी १२ एप्रिल रोजी ठाण्यात घेतलेल्या उत्तर सभेमध्ये त्यांनी मंचावरुन तलवार उंचवून दाखवल्यानंतर त्यांच्याविरोधात आर्म्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता अशाच प्रकारचा गुन्हा शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्याविरोधात दाखल करावा अशी चक्क मागणी मनसेने केली आहे.

नागपूर दौऱ्यावर असणाऱ्या राऊत यांनी मंचावरुन तलवार उंचावून दाखवल्याचा दावा मनसेनं केला आहे. राऊत यांचे नागपुरात अनेक ठिकाणी कार्यक्रम शिवसेनेच्या वतीने घेतले जात आहेत. २१ तारखेला राऊत यांच्या एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी त्यांना तलवार भेट म्हणून दिली. या नंतर राऊत यांनी मंचावरुन तलवार उंचावून कार्यकर्त्यांना दाखविली. याच प्रकरणी नागपूरच्या हुडकेश्वर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी निवेदन दिले आहे. संजय राऊतांविरोधात आर्म ॲक्टनुसार कारवाही करावी, अशी मागणी मनसेनं केल्याची माहिती प्रसारमाध्यमांशी बोलताना मनसेचे विदर्भ सरचिटणीस हेमंत गडकरी यांनी दिली.

## तापमान वाढल्याने थंड पेयांकडे आता नागरिकांचा वाढता कल

**उरण: वार्ताहर**

उन्हाळा म्हटला की, वातावरणातील तापमानात वाढ होणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. उरण, पनवेल सारख्या तालुक्यांमध्येही तापमानात वाढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानातून थंडावा मिळावा यासाठी नागरिक सध्या विविध थंड पेय घेताना दिसत आहेत. त्यात करुन उसाचा रस पिणे पसंत करत आहेत.



उसाचा रस हा आरोग्यासाठी उत्तम पर्याय ठरत आहे. उसाचा रस प्यायल्याने शरीराला थंडावा मिळतोच मात्र अन्य फायदेही होत आहेत. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची भीती सतत असते. उसाचा रसामुळे डिहायड्रेशनपासून बचाव होतो. उसाचा रस ऊर्जेचा उत्तम स्त्रोत आहे. यात संबधित ग्लूकोजची अधिक मात्रा असून, एक उत्तम एनर्जी ड्रिंक म्हणून याकडे पाहिले जाते. या शिवाय कावीळ झाली असल्यास उसाचा रस दिला जातो. दरम्यान उष्मामुळे सध्या सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उसाचा रस पिणाऱ्यांची संख्या खूपच आहे. खिशालाही परवडते असे जय भवानी रसवंती गृहाचे दामगुडे बंधू यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करा : ॲड. रेवण भोसले

**उस्मानाबाद : रामप्रहर वृत्त**

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाकडे तात्काळ शिफारस करण्याची मागणी जनता दल सेक्युलर पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा प्रवक्ते ॲड.रेवण भोसले यांनी केली आहे.

महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवग लागू करावी महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे रसातळाला गेली असून मुख्यमंत्र्यांसह सर्वच महाविकास आघाडीतील पुढारी कायदा हातात घेऊन बसले आहेत. राज्यातील जनतेची सुरक्षितता, सामाजिक अखंडता तसेच कायदा व सुव्यवस्था नियंत्रणात राखण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. खा. नवनीत राणा या महिला खासदारांना अर्वाच्च भाषा वापरून दंडुकेशाही व महाप्रसाद देण्याचे व्यक्तव्य केले जात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे, शेतमजूर, अल्पसंख्यांक आणि बेरोजगार तरुण यांचे प्रश्न सोडविण्यात आघाडी सरकारला कसलेही स्वारस्य उरलेले नाही. त्यामुळे जनतेच्या जीवावर आलेले महाराष्ट्राचे महाविकास आघाडीचे सरकार बरखास्त करून जनतेची सुटका करावी असेही ॲड.भोसले म्हणाले.

## पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा आता २० जुलैला!

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २० जुलैला घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या दृष्टीने विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली असून आता ३० एप्रिलपर्यंत अर्ज भरता येईल, तर २ मेपर्यंत शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल. राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

राज्य परीक्षा परिषदेमार्फत पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा जानेवारी–फेब्रुवारीमध्ये घेण्यात येते. मात्र कोरोना प्रादुर्भावामुळे विलंबाने सुरू झालेल्या शाळा, टीईटी गैरव्यवहारप्रकरणी सुरू असलेला पोलीस तपास, परीक्षेचे कामकाज देण्यात आलेल्या खासगी कंपनीने न्यायालयात दाखल केलेली याचिका अशा कारणांमुळे शिष्यवृत्ती परीक्षेच्या नियोजनावर परिणाम झाला. शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख जाहीर झाली नसल्याने विद्यार्थी, पालक, शिक्षकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. तसेच या परीक्षेच्या तारखेकडे लक्ष लागले होते. या पार्श्वभूमीवर यंदा २० जुलैला राज्यभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाचवेळी पाचवी आणि आठवीची परीक्षा घेण्याचे नियोजन परीक्षा परिषदेकडून करण्यात आले आहे. तसेच अर्ज करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी ३० एप्रिल आणि शुल्क भरण्यासाठी २ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

***सलग दुसऱ्या वर्षी परीक्षा लांबणीवर***

*गेल्यावर्षीही कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शिष्यवृत्ती परीक्षा लांबली होती. आता सलग दुसऱ्यावर्षी परीक्षा लांबल्याचे स्पष्ट झाले आहे.*

## पेण महावितरण कमर्चाऱ्यांना कार्यालयात घुसून मारहाण

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील पेण ग्रामीण शाखा विद्युत कार्यालयात घुसून आरोपींनी महावितरण कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना बुधवारी (दि. २०) दुपारी घडली आहे.





पेण शहरातील महावितरणच्या ग्रामीण शाखा कार्यालयात सहायक अभियंता थोरात यांच्या सांगण्यावरून फिर्यादी हरिश्चंद्र मोकल (रा. कुंभार आळी, पेण) व चंद्रकांत फसाळे हे त्यांच्या पेण येथील कार्यालयात बुधवारी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास शासकीय कामास्तव आले होते. त्यांच्या पाठोपाठ तीन आरोपी (रा. पेण) व इतर अनोळखी आठ ते दहा इसम कार्यालयात घुसले. त्यांच्यापैकी आरोपी क्रमांक दोन व तीन यांनी हरिश्चंद्र मोकल यांना शिवीगाळ केली व त्यांच्यापैकी कोणीतरी आरोपीने हाताबुक्क्याने मोकल यांच्या डोक्यास, उजव्या दंडास दुखापत केली. यावेळी आरोपी क्रमांक १ (रा. पनवेल) याने साक्षीदार चंद्रकांत फसाळे यांना शिवीगाळ करून अन्य आरोपींना चिथावणी दिली. त्यामुळे आरोपीपैकी कोणीतरी चंद्रकांत फसाळे यांना मारहाण केल्याने त्यांच्या कानास दुखापत झाली. या प्रकरणी हरिश्चंद्र मोकल यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला उपनिरीक्षक मीनल शिंदे करीत आहेत.

## तापलेल्या वातावरणात पक्षीही व्याकूळ
### वन विभागात घायाळ पक्ष्यांवर उपचार

**महाड : प्रतिनिधी**

सातत्याने बदलत असलेल्या तापमानामुळे माणूस हैराण झालेला असतानाच या वाढलेल्या तापमानाचा फटका पक्षी आणि प्राण्यांना देखील बसू लागला आहे. उष्माघाताचा त्रास झालेल्या एका घुबडावर आणि घारीवर महाड वनविभागात उपचार सुरु आहेत.



महाडसह विविध भागात तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसपर्यंत जाऊन पोहोचला आहे. ज्या भागामध्ये कधी उन्हाळा जाणवत नव्हता अशा भागांमध्ये देखील तापमानाने कहर केला असल्याने मानवी जीवन हैराण झाले आहे. वाढत्या उष्म्याचा पक्षी आणि प्राण्यांनादेखील त्रास सहन करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आटल्याने प्राण्यांना आणि पक्षांना उष्माघाताचा त्रास जाणवत आहे. महाडमध्ये उष्माघाताचा त्रास झालेले एक घुबड आणि एक घार चक्कर येऊन पडलेली आढळून आली. या दोन पक्षांना महाड वनविभागाच्या कार्यालयाचा आश्रय मिळाला आहे. या ठिकाणी त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत, अशी माहिती वनक्षेत्रपाल राकेश साहू यांनी दिली. वनविभागाच्या पिंजऱ्यामध्ये हे दोन्ही पक्षी निगराणीखाली ठेवण्यात आलेले आहेत. त्यांची तब्येत उत्तम होत असल्याचे आशादायी चित्र दिसून आले.

## रानमेवा आवक घटली
### दरही वधारले : उरणमधील वने, जंगले नष्ट झाल्याचा परिणाम

**उरण : रामप्रहर वृत्त**

विकासाच्या नावाने उरण तालुक्यातील वने व जंगल नष्ट होत असल्यामुळे रानमेवा मिळणे कमी झाले आहे. त्यामुळे उन्हाळ्यातील सहजगत्या मिळणारी जांभळे, रान्ना, जांभ, करवंदे व आंबे बाजारात आता कमी प्रमाणात येत आहेत. यामुळे याचे दरही वधारले आहेत.

दरम्यान यावर उपजिविका भागविणाऱ्या येथील आदिवासींच्या पारंपरिक व्यवसायावर संकट आले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. उरणमधील पूर्व विभागातील जंगले ही प्रचंड वन संपदेने बहरलेली होती. त्यामुळे वन्यजीवांसह येथील जंगलात परंपरेने वास्तव्य करणाऱ्या आदिवासींचाही उदरनिवार्ह होत होता. यात जंगलातील लाकूड फाटा गोळा करून तो गावोगावी जाऊन त्याची विक्री करणे, पावसाळय़ात येणाऱ्या विविध प्रकारच्या रानभाज्या गोळा करून त्यांची विक्री करणे, जोडीला जंगलातील शेती पिकविणे तर हिवाळा व उन्हाळय़ात जंगलात येणाऱ्या रानमेव्यांची विक्री करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह ते करीत होते.यामध्ये बहुतांशी जंगले ही रानमेव्यांनी बहरलेली असल्याने त्याचा फायदा आदिवासींना होत होता. मात्र जंगलातील फळ झाडे, वनस्पती नष्ट होत आहेत. परिणामी जंगलात मिळणारी फळे व रानमेवा यांची आवकच घटली आहे. आम्ही फ्रेन्डस ऑफ नेचर या संस्थेच्या माध्यमातून जंगल परिसरात पुन्हा जंगल फुलावे याकरीता प्रयत्न करत असल्याचे सांगण्यात आले.

**२०० ते २५० रुपये किलो**

**जंगल नष्ट झाल्याने सध्या उन्हाळ्यातील रानमेवा कमी मिळत आहे. त्यामुळे किलोमागे ५० रूपयांची वाढ झाली असून २०० ते २५० रुपये किलोचे दर असल्याची माहिती रानमेवा विक्रेत्यांनी यावेळी बोलताना दिली आहे.**



पान १ वरून

## राणा दाम्पत्याला पोलिसांकडून अटक

त्यानंतर सायंकाळी राणा दाम्पत्याला ताब्यात घेण्यासाठी खार पोलीस त्यांच्या घरात दाखल झाले. त्यावेळी पोलीस आम्हाला जबरदस्तीने पोलीस ठाण्यात नेत असल्याचा आरोपही राणा दाम्पत्याने केला आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्थेचे तिनतेरा वाजले आहेत. आमच्या जीवाला धोका झाल्यास मुख्यमंत्री जबाबदार असतील असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

यानंतर मातोश्रीशी छेडछाड करू नका, २० फूट खाली गाडले जाल, शिवसेनेच्या संयमाची परीक्षा पाहू नका, असा इशारा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी राणा दाम्पत्याला दिला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यावर कारवाई करावी. आमच्यावर हल्ला करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच कार्यकर्त्यांना सांगितले असल्याचा आरोप या वेळी खासदार नवनीत राणा यांनी केला.

शिवसेना खुलेआम गुंडगिरी करत आहे. पोलीस प्रशासन मुख्यमंत्र्यांच्या दबावाखाली काम करीत आहे. तुमच्याकडे जरूर पोलीस प्रशासन असेल, पण आमच्या लोकांनीही आम्हाला ताकद दिली आहे. बजरंगबलीची ताकद आमच्यासोबत आहे. कुणीही आमच्या केसालाही धक्का लावू शकत नाही, अशा शब्दांत खासदार नवनीत राणा यांनी निशाणा साधला.

***राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती पूर्ण बिघडली आहे. हनुमान चालिसा म्हणण्यात विरोध करण्यासारखे काय आहे? एखादी व्यक्ती आपल्या घराबाहेर हनुमान चालिसा म्हणण्यास येत असेल तर मुख्यमंत्र्यांनी त्याला मानाने घरात बोलावावे. तसे नको असेल तर रोखण्यासाठी पोलिसांना बोलवावे, परंतु सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरविणे हे अनाकलनीय आहे.***

***– चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष***

## आमदार प्रशांत ठाकूर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापौर डॉ. कविता चौतमोल, उप महापौर सीता पाटील, महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बाल कल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती सभापती संजना कदम, प्रमिला पाटील, अरुणा भगत, वृषाली वाघमारे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, एकनाथ गायकवाड, बबन मुकादम, अभिमन्यू पाटील, प्रविण पाटील, संतोष भोईर, राजेंद्र शर्मा, निलेश बाविस्कर, नगरसेविका चारुशीला घरत, अनिता पाटील, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष कदम, युवा नेते समीर कदम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, विपुल पटेल, सूर्यकांत ठाकूर, गीता चौधरी, राम वरदायिनी ट्रस्टचे अध्यक्ष प्रतापराव शिंदे, मंडळाचे अध्यक्ष शेखर कदम, सचिव प्रशांत कदम, खजिनदार जितेंद्र कदम यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कबड्डी प्रेमी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेच्या निमित्त अर्जुन पुरस्कार विजेते अर्जुन शिंदे, राजू भावसार आदी क्रीडापटूंचा विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी म्हंटले की, सामाजिक, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पावलावर पाऊल ठेवत आमदार प्रशांत ठाकूर काम करीत आहेत. मातीतल्या खेळाडूंना जास्तीत जास्त मदत व्हायला पाहिजे. यासाठी अधिक प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी आश्वासित केले. तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आदर्श घेऊन आमदार प्रशांत ठाकूर काम करत असल्याचा पुनरुच्चार करून आयोजक, खेळाडू यांना धन्यवाद दिले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्याला कबड्डी या मैदानी खेळाची परंपरा लाभली आहे. येथील गावागावात अनेक दिग्गज खेळाडू यामध्ये आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कै. बुवा साळवी यांच्या आशीर्वादाने त्या स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. देशात कबड्डी होती पण घराघरात कबड्डीचा थरार पोहोचला तो त्याला मिळालेल्या ग्लॅमरमुळे. जय भवानी तरुण मित्र मंडळाच्यावतीने या गावातून अनेक खेळाडू महाराष्ट्राला दिले आहेत. कोयना प्रकल्पगस्तांचे हे वंशज आहेत. कबड्डी खेळाविषयीचे प्रेम आणि आपली जी दैवत आहेत त्यांच्याविषयी असलेला आदर भाव पुढच्या माहिती करून देण्यासाठी ही सर्व मंडळी प्रयत्न करीत आहेत, असे सांगतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी खेळाडू, प्रेक्षक आणि आयोजकांना धन्यवाद दिले तसेच या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिल्याचे आवर्जून नमूद करत प्रवीण दरेकर यांना त्यांनी धन्यवाद दिले.

***कबड्डी स्पर्धा घ्यावी अशी विनंती संजना कदम यांनी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे केली होती आणि त्यावर त्यांनी ताबडतोब होकार दिला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये अनेकदा राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा स्पर्धा घेण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचे महत्वपूर्ण सहकार्य लाभले, त्याबद्दल आयोजकांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांचे मनःपूर्वक आभार मानतो.***

***– समिर कदम, युवानेते भाजप***

*या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ २४ एप्रिलला माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रविंद्र चव्हाण आणि आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते होणार आहे. तर या स्पर्धेतील विजेत्या संघास एक लाख रुपये व आमदार चषक, उप विजेत्या संघास ५० हजार रुपये व आमदार चषक तर उपांत्य विजयी दोन्ही संघास प्रत्येकी २५ हजार रुपये व आमदार चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेतील मालिकावीरास मोटारसायकल, उत्कृष्ट चढाई आणि उत्कृष्ट पकड प्रत्येकी १० हजार रुपये तर पहिला व दुसरा दिवस मानकरीला प्रत्येकी पाच हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.*

## निवडक

### ट्रकच्या बॅटऱ्यांची चोरी

**पनवेल :** खारघर वसाहत परिसरात उभ्या करून ठेवलेल्या दोन ट्रकमधील बॅटऱ्यांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. वृत्त असे की, वाहतूकदार प्रिया राजमाने यांच्याकडील दोन ट्रॅक वसाहतीमधील सेक्टर १० या ठिकाणी उभे करून ठेवले असता अज्ञात चोरट्याने या ट्रकमधील बॅटऱ्या चोरून नेल्या असून याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये संवादकौशल्ये प्रशिक्षण शिबिर

**पनवेन :** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी व भाजपा, सांस्कृतिक सेल–उत्तर रायगड तर्फे २९ व ३० एप्रिल २०२२ रोजी वक्तृत्वकला आणि संवादकौशल्ये प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना तसेच लोकप्रतिनिधींनाही वक्तृत्वकला व संवाद कौशल्याची आवश्यकता भासते. आजच्या स्पर्धात्मक युगात सादरीकरणाला महत्व आहे त्यामुळेच आपले संवादकौशल्य व वक्तृत्व हे उत्तम असणे गरजेचे आहे. यासाठीच ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह, मार्केट यार्ड, पनवेल येथे होणार आहे. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी तर्फे गेली अनेक वर्षे या विषयांवर सखोल व उत्तम असे प्रशिक्षण दिले जाते. या शिबिरात सामील होण्यासाठी इतरत्र ठिकाणी रु ३,००० ते ३,५००/– शुल्क आकारण्यात येते. परंतु भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार हे शिबिर व प्रशिक्षणासाठी सवलतीचे शुल्क रु.१०००/– (नाष्टा, भोजन व प्रशिक्षण साहित्यासमवेत)आकारण्यात येत आहे. या शिबिरात आपले नांव नोंदविण्यासाठी अभिषेक पटवर्धन ९०२९५८०३४३, अविनाश कोळी ९८२०८९८८०८ यांच्याशी संपर्क करावा असे कळविण्यात आले आहे.

### जागतिक पुस्तक दिन साजरा

**पनवेल :** जागतिक पुस्तक दिन व डॉ. आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने सत्याग्रह कॉलेज, सिद्धार्थ मल्टीपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल यांच्या माध्यमातून १२ तास वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत तीन गट ठेवण्यात आले होते. पहिला गट आठवी ते बारावी, बारावी ते पदवीधर दुसरा गट तसेच खुला गटात ही स्पर्धा पार पडली. नवी मुंबई, मुंबईमधील विद्यार्थी तसेच नागरिकांना या स्पर्धेत मोफत प्रवेशाची संधी देण्यात आली. शनिवारी स. ९ वाजता या स्पर्धेला खारघर सत्याग्रह महाविद्यालयातील शांताबाई रामराम सभागृहात सुरुवात झाली. स्पर्धकांनी सहा तास वाचन केल्यास स्पर्धेत सहभाग घेतल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. सहा ते आठ तास वाचन केल्यास दोन हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आठ ते दहा तास वाचन केल्यास तीन हजार रुपये, १० ते १२ तास वाचन करणाऱ्यास चार हजार रुपये व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

# महावितरणचा वीज ग्राहकांना शॉक!

## एकाच महिन्यात दोन वीजबिले माथी; रक्कम भरायची कुठून? ग्राहकांचा संतप्त सवाल

**उरण : बातमीदार**

महावितरणकडून वीज ग्राहकांना नेहमी एका महिन्याचे एकच वीजबिल येत असते मात्र चालू महिन्यात म्हणजेच एप्रिल महिन्यात प्रत्येक ग्राहकाला महावितरणतर्फे दोन वीजबिले देण्यात आल्याने ग्राहकांमध्ये संतप्त प्रतिक्रीया उमटल्या आहेत.

या बिलांच्या वाटपामध्ये एक नियमित वीजबिल तर दुसरे अतिरिक्त सुरक्षा रकमेचे वीजबिल आहे. ही दोन्ही वीजबिले एकाच वेळी नागरिकांना मिळाल्याने ग्राहक संतप्त झाले आहेत. उरण तालुक्यामध्ये या प्रकार उघडकीस आला आहे. आता हे रेग्युलर वीजबिल व दुसरे बिल अतिरिक्त सुरक्षा रकमेचे वीजबिल आता कसे भरायचे, पैसे कुठून आणायचे या विवंचनेत सर्वसामान्य वीजग्राहक सापडला आहे. महागाईत सर्वात मोठा झटका वीज बिलांचा सर्वसामान्य ग्राहकांना बसल्याने एकाच वेळी दोन वीज बिले पाठवून महावितरण कंपनीने ग्राहकांना एकप्रकारे शॉक दिला आहे.



कोरोनामुळे नागरिकांच्या घरची परिस्थिती अजूनही सुधारलेली नाही. त्यातच महागाई दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आर्थिक घडी अजूनही व्यवस्थित बसलेली नसताना अचानक महावितरणने एकाच वेळी दोन वीज बिले पाठवून ग्राहकांचे कंबरडे मोडले आहे. एक बिल रेग्युलर आहे तर दुसरे वीज बिल सुरक्षा रकमेच्या नावाखाली देण्यात आलेले आहे. मात्र सुरक्षा रकमेच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा रुपये महावितरण ग्राहकांकडून वसुल करीत असल्याचा आरोप नागरिकांचा आहे

कोरोना संपतो न संपतो तोच महागाईने डोके वर काढले आहे. महागाईला कंटाळून गेलेल्या नागरिकांना वीजबिलांचा शॉक बसल्याने नागरिक पूर्णपणे कंटाळले असून महावितरणच्या कारभारावर नाराज आहेत. अगोदरच महावितरण वीज विक्रीकर, स्थिर आकार, वीज आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क, आदी भरमसाठ आकार(कर) महावितरण वीज बिलांच्या नावाखाली ग्राहकांच्या माथी मारत आहे. आता तर दोन बिले मिळाल्याने नागरिकांना एकच शॉक बसला आहे.

वीजबिल नाही भरले तर वीज तोडण्यात येईल असे महावितरणच्या कर्मचाऱ्यांमार्फत ग्राहकांना सांगण्यात येत आहे. या मुळे वीज ग्राहक घाबरून वीजबिले भरत आहेत. तर अनेक ग्राहकांचे मीटर बंद असूनही त्यांच्या माथी सरासरी वीज बिल मारण्यात आले आहे. नवीन मीटर उपलब्ध करून मीटर बदलून देण्याची मागणी केली असता तेही वेळेत उपलब्ध होत नसल्याने महावितरणचे ग्राहक या सर्व गैरसुविधांमुळे पूर्णपणे वैतागले आहेत.

> **महावितरणतर्फे नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास दिला जात नाही. प्रत्येक नागरिकांनी दोन्ही वीजबिले भरून महावितरणला सहकार्य करावे. एक रेग्युलर वीजबिल असून दुसरे सुरक्षा अनामत रक्कम अशी दोन्ही वीज बिले भरणे नागरिकांना अनिवार्य आहे. वीज ग्राहकांच्या वापरानुसार महिन्याचे वार्षिक सरासरी अंदाजे बिल काढले जाते. ज्यांचे वीज वापराचे युनिट अधिक आहे अशा सरासरी वीज बिलांवर अनामत रक्कम निश्चित केली जाते. ही रक्कम नियमानुसार महावितरणकडे सुरक्षित ठेवली जाते. त्यामुळे प्रत्येक ग्राहकाने अनामत रक्कम भरून महावितरणाला सहकार्य करावे.**
> **–विजय सोनवले–अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उरण.**

### गॅस टँकर चालकाला मारहाण

**पनवेल :** अज्ञात त्रिकूटाने गॅस टँकर चालकाला मारहाणकडून लुटल्याची घटना पनवेलजवळील मुंबई–पुणे एक्स्प्रेस हायवेवर पुणे लेन येथे घडली आहे.

गॅस टँकर चालक साजिद अंसारी (३०) हा त्याच्या ताब्यातील गॅस टँकरने (क्र. एम.एच. १२ एन.एक्स ८८८१) मुंबई–पुणे एक्स्प्रेस हायवेने पुणे येथे जात होता. कि.मी. ९/८०० येथे हे वाहन आले असता अंदाजे २० ते २५ वर्षे वयाच्या दोन व्यक्तींनी त्याची गाडी अडवून गाडीत चढून त्याला जबरदस्तीने खाली खेचले. त्याचवेळी रस्त्याच्या बाजूला असलेल्या अंधारातून आलेल्या ३० ते ३५ वर्षे वयाच्या एका व्यक्तीने कपाळावर लाकडी काठीने मारून त्याला जखमी केले. इतर दोघांनी त्याच्या हातातील मोबाईल व रोख रक्कम रुपये ७,००० जबरदस्तीने हिसकावून घेतली. त्यानंतर तिघे जण पळून गेले. या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)




**पनवेल : महेश डोंगरे निर्मित समरेणु या मराठी चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आदी उपस्थित होते.**





**पनवेल : महापालिका क्षेत्रातील मॉन्सूनपूर्व कामांच्या संदर्भात सभागृह नेते परेश ठाकूर यांचा पाहणी दौरा सुरु आहे. या दरम्यान महापालिका क्षेत्रातील घोट आणि तळोजा मजकूर येथील रस्ते आणि नाल्यांच्या कामांची शनिवारी पाहणी केली. कामांचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, दिनेश केणी, बालाराम पाटील, संतोष पाटील, महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.**

# कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर यांना ‘राज्यस्तरीय आदर्श सरपंच’ पुरस्काराने गौरविले

**पनवेल : प्रतिनिधी**

शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकासाच्या संदर्भात उल्लेखनिय व भरीव काम करणारे पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर यांचा सरपंच परिषद मुंबईच्या वतीने मानाच्या ’राज्यस्तरीय आदर्श सरपंच’ पुरस्काराने सन्मान करण्यात आला. अहमदनगर येथे झालेल्या समारंभात त्यांना आदर्श गाव योजनेचे प्रदेश कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, माजीमंत्री सुरेश धस, आमदार प्रशांत बंब, आमदार निलेश लंके, अंमलबजावणी संचालनालयाचे सह आयुक्त उज्वलकुमार चव्हाण यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.




सरपंच सदाशिव वास्कर यांनी लोकप्रतिनिधी म्हणून विविध शासकीय योजना राबविण्याबरोबरच अनेक उपक्रम ग्रामपंचायत हद्दीत राबविले आहेत. मातृपितृ पूजन दिवस गावामध्ये साजरा करून जवळपास ३५० आई–वडिलांची त्यांच्या मुलांकडून व लेकी सुनांकडून विधिवत पूजा केली जाते. वृक्षारोपण व संवर्धन, अलौकिक कार्य करणाऱ्या महिलांचा तसेच हरिपाठ मंडळ, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचा गौरव, विविध शिबिरे, कोरोना काळात अन्नधान्य वाटप, रोग प्रतिबंधात्मक फवारणी, सुकन्या समृद्धी योजनेंतर्गत गावातील १२४ मुलींची पोस्टामध्ये खाते उघडून त्यांच्या नावावर प्रत्येकी २५०० रुपये दरवर्षी जमा केले जात आहेत. विविध प्रकारची समाजोपयोगी कार्ये सरपंच सदाशिव वास्कर आणि कुंडेवहाळने करत समाजात आदर्श काम केले आहे. त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे यंदाचा राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. सोहळ्यासाठी उपसरपंच जागृती वास्कर, सदस्य विनोद भोईर, दत्तात्रेय पाटील, ऋषिकेश वास्कर, करिष्मा वास्कर, ग्रामसेवक संजय बडे, रंजना वास्कर, माजी उपसरपंच आर. आर. वास्कर, सुदाम वास्कर, प्रीती वास्कर, गणेश कडू, कैलास वास्कर, प्रवीण पाटील, सुभाष म्हात्रे, तुषार पाटील, काशिनाथ पाटील, विनायक वास्कर, संजय भोईर, हासुराम वास्कर, हरेश्वर भोईर, लहू कातकरी, संकेत म्हात्रे, केवल भोईर यांच्यासह ग्रामस्थ आवर्जून उपस्थित होते.



**पनवेल : कुंडेवहाळ सरपंच सदाशिव वास्कर यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याबद्दल पनवेल भाजपचे तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल : शहरातील गावदेवी पाडा येथील जाखमाता मंदिरात ‘गावदेवी माता पालखी सोहळा’ आयोजित करण्यात आला. या सोहळ्याला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी भेट देत दर्शन घेतले. यावेळी प्रशांत शेट्टे, भाजप युवा नेते केदार भगत, प्रमोद घरत, मयूर भोपी, चंद्रशेखर भोपी, सुमित दसवते, हर्षद गडगे, भावेश शिंदे उपस्थित होते.**

# जासई येथे ‘शाळापूर्व तयारी’ मेळावा उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील प्रार्थमिक शाळा जासई येथे शाळापूर्व तयारी अभियानांतर्गत बाल मेळावा प्रारंभ लेझीम ढोल ताशा व विविध घोषणा देत व विद्यार्थ्यांनी वेशभूषाकरून प्रभात फेरीने मोठ्या उत्साहात करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळा समितीचे सदस्यांसमवेत अंगणवाडी सेविका यांनी सहभाग घेतला होता. यावेळीं रुपेश पाटील यांनी सुस्वर गायन केले. पहिल्या इयत्तेत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुष्प व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व भावनिक भाषिक आणि गणितीय क्षमतांचा विकास करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट होते. उपस्थित मान्यवरांकडून उभारण्यात आलेल्या स्टॉलची पाहणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उरण पंचायत समितीचे माजी सदस्य नरेश घरत उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका मुंबईकर यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला व शाळापूर्व तयारीचे महत्व सांगितले. याशिवाय दत्ता घरत, अरुण घाग,सुचिता जोशी आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले. जासई येथील कोरोनात मृत्यू झालेले तरुण दिवंगत कार्यकर्ते मेघनाथ म्हात्रे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शशिर म्हात्रे यांनी शाळेस १५ भिंतीवरील घड्याळे भेट दिली. पाहुण्यांच्या हस्ते सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे उद्घाटन करण्यात आले. बालमेळाव्याचे औचित्य साधून पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले.







**पनवेल : आई गावदेवी मातेचा वर्धापन दिन देवीचा पाडा सोहळ्यानिमित्त भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या सत्कार प्रसंगी अशोक साळुंके, कालुराम फडके, महेंद्र म्हात्रे आकाश फडके, करण फडके, सोपान पाटील आदी उपस्थित होते.**

रविप्रहर
राम प्रहर
www.ramprahar.com

# तयारी हवाई वाहतूक क्षेत्राच्या ‘टेक ऑफ’ची!

**मार्च महिन्यात एक कोटीवर नागरिकांनी विमान प्रवास केला, याचा अर्थ कोरोनानंतर ही सेवा पूर्वपदावर आली आहे. या क्षेत्रात अलीकडे अशा काही घटना घडत आहेत की ते मोठी झेप घेण्यास सज्ज झाले आहे. पायाभूत सुविधांचा विकास, जलद प्रवास आणि रोजगार वाढ अशा सर्वच दृष्टीने या घडामोडी महत्वाच्या आहेत.**

एकेकाळी अतिश्रीमंत नागरिकांचाच विमान प्रवासाशी संबंध येत होता, पण आता अनेक मध्यमवर्गीय नागरिक विमानाने प्रवास करू लागले आहेत. त्याचाच परिणाम म्हणजे भारतातील हवाई वाहतूक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढली असून ते नवी झेप घेण्यास सज्ज झाले आहे. कोरोनाचा सर्वाधिक फटका या क्षेत्राला बसला आणि या क्षेत्राचे आता कसे होणार, अशी चिंता निर्माण झाली. पण जेव्हापासून प्रवासावरील निर्बंध टप्प्याटप्प्याने मागे घेतले जाऊ लागले आहेत. तेव्हापासून भारत अंतर्गत हवाई वाहतूक नवनवे उच्चांक प्रस्थापित करू लागली आहे. गेल्या तीन चार महिन्यातील या क्षेत्रातील घटना देशाच्या दृष्टीने अतिशय उत्साहवर्धक अशा आहेत.

**मार्चमध्ये एक कोटी प्रवासी**

आगामी चार वर्षांत एअरपोर्टची बांधणी आणि विकास यासाठी तब्बल १०० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून देशातील विमानतळांची संख्या याकाळात सध्याच्या १४१ वरून २०० होईल, अशी माहिती अलीकडेच हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली. हे आकडे खूप महत्त्वाकांक्षी वाटतात, हे खरे असले तरी या क्षेत्रात ज्या हालचाली सध्या सुरु आहेत, ते लक्षात घेता ही आकडेवारी वास्तवाला धरून आहे, असे म्हणता येईल. गेल्या आठ वर्षात ६७ नवी विमानतळे देशात सुरु झाली आहेत, हे लक्षात घेता आणि सध्या सुरु असलेली कामे पाहता २०० हा आकडा भारतासारख्या मोठ्या देशासाठी जास्त नाही. रविवारी दि. १६ एप्रिल रोजी एका दिवसात तब्बल चार लाख सात हजार नागरिकांनी विमान प्रवास केला, यावरून प्रवाशांची वाढती संख्या लक्षात येते. मार्च २२ मध्ये एक कोटी सहा हजार नागरिकांनी विमान प्रवास केला, जो फेब्रुवारी २२ पेक्षा २२ लाखांनी अधिक होता. विमान वाहतूक करणाऱ्या कंपन्यांचा व्यवसाय चांगला व्हायचा असेल तर प्रत्येक विमानात विशिष्ट प्रवासी बसले पाहिजेत. या निकषाचा विचार करता मार्चमधील लोड ८० टक्के इतका राहिला आहे.

**नव्या विमान कंपन्या रांगेत**

इंडिगो, स्पाईसजेट, विस्तारा, गो फस्ट, एअर इंडिया आणि एअरआशिया या देशातील प्रमुख कंपन्या असून त्या त्यांची सर्व क्षमता वापरून सध्या सेवा देत आहेत. एवढी स्पर्धा असूनही सर्वांना प्रवासी मिळत असतील तर या क्षेत्रात अजून संधी आहे, असा संदेश नव्या गुंतवणूकदारांनी घेतला, तर काही नवल नाही. या क्षेत्रात उतरायचे तर कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करावी लागते. विमान कंपन्या संकटात सापडण्याच्या घटना जगात घडत असताना भारतात या क्षेत्रात नव्या कंपन्या उतरत आहेत, यावरून भारतातील संधीची कल्पना येते. भारतातील सर्वात मोठे गुंतवणूकदार मानले जाणारे राकेश झुनझुनवाला यांनी आकाश एअरलाईन सुरु करण्याचा निर्णय घेतला असून तिची सेवा यावर्षी सुरु होईल. जेट एअरवेज कंपनी २०१९ मध्ये बंद पडली पण ती नव्या गुंतवणूकदारांनी विकत घेतली असून तिची सेवा येत्या ऑक्टोबरमध्ये सुरु होणार असे जाहीर झाले आहे.







या कंपनीत नव्याने एक हजार ३५० कोटी रुपये टाकण्यास गुंतवणूकदार तयार झाले आणि फ्लायबिग, स्टार एअर आणि ट्रूजेट अशा नव्या कंपन्या रांगेत आहेत, यावरून या क्षेत्रातील संधीची कल्पना येते.

**रोजगारवाढीसाठीही महत्त्वाचे क्षेत्र**

भारताच्या आकाशात सध्या ८०० मोठी आणि १५० छोटी विमाने उडतात. प्रवासी वाढल्यामुळे त्यांच्या फेऱ्या वाढत आहेत, याचा अर्थ त्यासाठी पायलट लागणारच. पण तेवढे पायलटच सध्या उपलब्ध होत नाहीत. कारण भारतात साधारण ४०० ते ६०० पायलट दरवषी कमर्शियल पायलटचे शिक्षण पूर्ण करतात. पण आगामी काळात दरवर्षी १५०० ते २००० पायलट लागणार आहेत.

पायलटचे शिक्षण घेण्यासाठी अनेकांना परदेशात जावे लागते. कारण त्या प्रकारचे शिक्षण देणाऱ्या संस्था देशात कमी आहेत. त्याचे कारण त्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक होय. या दीड दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी ४० ते ५० लाख रुपये लागतात. ही रक्कम खर्च करणारे नागरिक किती असणार? त्यामुळे अनेकदा भारतीय विमाने विदेशी पायलट उडवताना दिसतात. एका विमानाला दोनच पायलट लागतात, पण ती सेवा देण्यासाठी शेकडो कर्मचारी काम करत असतात. त्यामुळे या क्षेत्रात रोजगार वाढीच्या संधी पाहता त्यादृष्टीनेही त्याला महत्व आहे. याचा अर्थ हवाई वाहतूक क्षेत्रात जाण्यासाठीचे शिक्षण मुलांना देण्याची गरज आहे.

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

### हवाई वाहतूक क्षेत्रातील काही महत्वाच्या घडामोडी

- भारतातील सर्वात मोठी विमान कंपनी – इंडिगोने कतार एअरवेजशी करार केला, त्यानुसार दोहाते दिल्ली, मुंबई, हैद्राबाद प्रवासात या दोन कंपन्या एकमेकांना सहकार्य करणार आहेत. (कोड शेअरिंग) ही सेवा सोमवारपासून (दि. २५) सुरु होत आहे. तरदोहा ते चेन्नई, बंगळूरू, कोची, कोझीकोडही सेवा ९मे पासून सुरु होत आहे. कतार एअरवेज भारतातून आठवड्याला १२ शहरांतून १९० उड्डाणे करते तर इंडिगोदोहाहून भारतीय आठ शहरांत आठवड्याला १५४ उड्डाणे करते, यावरून या कराराचे महत्व लक्षात येते.
- स्पाईसजेटने २७ मार्चपासून नव्या ६० फेऱ्या सुरु केल्या असून त्यात उड्डाण योजनेतील छोट्या शहरांचाही समावेश आहे. याच कंपनीची काही आंतरराष्ट्रीय उड्डाणे एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात सुरु होत आहेत.
- हिंदुस्थान एरोनॉटिक्स कंपनी आतापर्यंत फक्त लष्करी विमानांची बांधणी करत होती, पण तिने आता नागरी विमानांची निर्मिती सुरु केली आहे. देशी बनावटीचे असे पहिले विमान (डोर्नियर २२८) आसामचे दिब्रुगढते अरुणाचलच्या पासीघाट दरम्यान सुरु झाले आहे. सरकारी अलायन्स ही कंपनी ही सेवा देत आहे. आसामच्या लीलाबारी येथे विमान उड्डाणाचे प्रशिक्षण देणारी संस्था एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात सुरु झाली आहे.
- काश्मीरमध्ये यावर्षी विक्रमी पर्यटक गेल्याचे आपण वाचले. त्यात हवाई वाहतुकीचा किती वाटा आहे पहा–२९मार्च रोजी श्रीनगर विमानतळावर १५ हजार १४ प्रवाशांची ये–जा झाली. या विमानतळावर आता दररोज १०२ विमान फेऱ्या होत आहेत.
- ईशान्य भारत हा भारताच्या मुख्य भूमीपासून लांब तसेच काही भाग दुर्गम आहे. त्यामुळे तेथे जाण्यासाठी हवाई वाहतुकीचा विस्तार करण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन त्या भागासाठी २,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून तेथे पुढील तीन वर्षात १८ धावपट्ट्या तयार केल्या आहेत. शेतीमालाच्या वाहतुकीसाठी त्यांचा वापर होणार आहे.
- गुजरात आणि महाराष्ट्रात विमान सेवा वापरणाऱ्यांची संख्या अधिक आहे. हे लक्षात घेऊन या दोन्ही राज्यात नवी विमानतळे होत आहेत. महाराष्ट्रातील गोंदिया आणि कोकणात चिपी येथे अशातच विमानसेवा सुरु झाली आहे. तर शिर्डी येथील विमानफेऱ्या वाढू लागल्या आहेत. गुजरातमध्ये अलीकडेच केशोद येथे विमानसेवा सुरु झाली.

# गुंतवणूकदारांचे तीन प्रकार.. तुम्ही कोणत्या गटात आहात?

**सध्याच्या बाजारात अनेकजण गोंधळलेले दिसत आहेत. मागील दोन वर्षांत ’झट मंगनी पट शादी’ची सवय लागली असल्याने घेतलेले शेअर्स सांभाळणे हे जिकिरीचं वाटू लागलंय. साधारणपणे वर्गवारी केल्यास अशा गुंतवणूकदारांचे खालीलप्रमाणे तीन गटात वर्गीकरण करता येईल.**

**१) भावनिक** (emotional)

हे लोक केवळ पैसे गुंतवूनकरुन थांबत नाहीत तर त्यांचसोबत आपल्या भावनाही गुंतवतात. शेअरबाजाराच्या चढउताराप्रमाणं यांच्या भावनेमध्येही चढउतार येतो. गुंतवणूक मूल्य वाढलं तर अजून गुंतवणूक करायसाठी धडपडतात किंवा ती केली नसल्यास चरफडतात आणि उलट केलेल्या गुंतवणुकीचं मूल्य कमी झाले तर चरफडत नुकसान सोसून पैसे काढून घेतात, आणि मग शेअरबाजार किंवा म्युच्युअल फंड हे कसे वाईट हे इतरांना सांगत राहतात. हा एक मोठा स्वभावदोष असून तो तुम्हाला भांडवलवृद्धी करण्यापासून वंचित ठेवतो. चांगल्या गुंतवणूक सल्लागाराच्या मदतीनं यांवर मात करता येणं शक्य आहे. पण हीच व्यक्ती जर चुकीच्या माणसाकडं गेली तर ? तर मात्र त्याच्या हळव्या स्वभावाचा फायदा घेऊन तो अशा लोकांना त्याच्या स्वतःच्या फायद्यासाठी सहज गंडवू शकतो.

**२) असमंजस** (confused)

अशी व्यक्ती कायम ’क्या करे क्या ना करे’ वाल्या मोडमध्ये असतात. यांची व्हिजन कधीच साफ नसते, म्हणजेच दूरदृष्टीपणा नसतोच. आपण नेमकी कुठे आणि कशाकरता गुंतवणूक करत आहोत हे त्यांचं त्यांनाच कळत नाही. आपला निर्णय बरोबर आहे की चुकला, याची सतत पडताळणी हे गोंधळलेले लोक करत असतात. खूप विचार करुन निर्णय घेतल्यावर सुद्धा आपला निर्णय चुकला आहे असं यांना सतत वाटत राहतं. या लोकांना ओळखण्याचा सोपा मार्ग म्हणजे या कुणावरही विश्वास दाखवत नाही. अगदी स्वत:वर सुद्धा... मध्येच १० वर्षांसाठी म्हणून म्युच्युअल फंडात एखादी एसआयपी सुरु करतील आणि काही दिवसांनी बंद देखील करतील, असं यांचं चाललेलं असतं. हे लोक गुंतवणूक सल्लागाराला पण विचलीत करायचा प्रयत्न करतात. त्यांना एकच प्रश्न वेगवेगळ्या मार्गाने विचारुन भंडावून सोडतात, त्याचं उत्तर मिळालं की त्यांच्या मनांत अनेक उपप्रश्न तयार होतात. कसेबसे मग उपकार केल्यासारखं सल्लागारावर थोडासा विश्वास ठेऊन आणि संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर टाकून ही मंडळी गुंतवणूक करतात पण काही दिवसानंतर लगेच त्यांना परत झटका येऊन ते परस्पर काहीतरी विचित्र निर्णय घेऊन स्वत:च्याच भांडवलवृद्धीला हरताळ फासतात आणि नावं मात्र सल्लागाराला ठेवतात. यांचा सर्वात मोठा ’शत्रू’ दुसरं कोणी नसून हे स्वत:च असतात. कित्येक अनुभवानंतरही यांच्या स्वभावात बदल होत नाही. एकच चूक परत परत करण्यात अशांचा हातखंडा असतो, एका अर्थानं प्रचंड चंचलबुद्धीचे ते स्वामी असतात. कधी इक्विटी फंडात गुंतवणूक कर, तर तिथून पैसे काढून सोन्यामध्ये गुंतवणूक कर, लगेचच त्यातून काढून मध्येच शेअर्समध्ये गुंतव आणि मग तिथून काढून घेऊन जमिनीमध्ये गुंतवणूक कर अशा फेर्यांकत यांचं संपूर्ण आयुष्य खर्च होतं, पण यांच्या हाताला शेवटपर्यंत कुठेच काही लागत नाही. हे लोक कुठुनही कधीच पैसे कमावू शकत नाही. असे लोक स्वत:च्या दुटप्पी धोरणामुळं स्वतःची संपत्ती कधीच बनवू शकत नाहीत.

***गुंतवणूक का करावी ? ती कोठे करावी ? ती कोठे करू नये.. गुंतवणूक कशी करावी ? गुंतवणूक कधी करावी ? गुंतवणूक किती करावी ? या सर्वच बाबींना फारच महत्त्व आहे आणि यांची उत्तरं व त्यानुसार शंकांचं निरसन करून योग्य गुंतवणूक साधनांद्वारे दूरदृष्टी ठेवून योग्य प्रकारे गुंतवणूक करणं हे तुमच्या गुंतवणूक सल्लागाराद्वारेच होऊ शकते. आपल्या स्वतःच्या गरजा समजून घेणं आणि त्यानंतर गुंतवणूकीची निती आखणे आवश्यक आहे.. बघा पटतंय का..?***

**३) शांत व संयमी**

या व्यक्ती गुंतवणूक करतानांच आपण का? कोठे? कशाकरीता? किती कालावधीसाठी? गुंतवणूक करत आहोत याचा सारासार विचार करतात. गुंतवणुकीत नेमकी किती जोखीम आहे? आणि आपल्याला नेमका किती परतावा मिळू शकतो यांचा आढावा घेऊन, उज्वल भविष्याच्या दृष्टीनं हे लोक विचारपूर्वक निर्णय घेतात. हे देखील सल्लागारास अनेक प्रश्न विचारून त्यांच्या शंकांचं निरसन करतात आणि त्यांच्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरं मिळाल्यास ते सल्लागारावर पूर्ण विश्वास दाखवून गुंतवणूक करतात. शेअरबाजारात सुरुवातीलाच चांगला फायदा झाला तरी ते आनंद व्यक्त करत नाही किंवा शेअरबाजार खाली गेला तरी नुकसान बघून हे लोक विचलीत होत नाहीत. आपल्या लक्ष्यापर्यंत पोहचेपर्यंत हे लोक कोठेच थांबत नाहीत कारण, आपण नेमकं काय करत आहोत याचं त्यांना चांगलं भान असतं. समुद्राच्या तळाशी असणार्यात शांत प्रवाहासारखा यांचा स्वभाव असतो. इतिहास साक्षीला आहे, की शेअरबाजारात कागदांवर दिसणारा परतावा या लोकांच्या पोर्टफोलिओमध्ये देखील आढळून येतो.

या लोकांकडून सल्लागाराला देखील खूप काही शिकायला मिळतं. एक चांगला गुंतवणुकदार कसा असावा याचा आदर्शपाठ म्हणून यांच्याकडं बघितलं जातं. सल्लागांराच्या नजरेत यांची फार ’इज्जत’ असते.

या ३ मध्ये आपण कुठल्या वर्गवारीत येता..? हे तपासून बघा, गरज असेल तर आपल्या स्वभावांत बदल करा, कारण आपण ’भारताच्या विकसनशील ते विकसीत राष्ट्र’ या विशिष्ट काळांत गुंतवणूक प्रवास करत आहोत. ‘रस्ते कभी गलत नहीं होते, बस हम भटक जाते है’। इथे भटकलात, तर ही संधी पुन्हा मिळणार नाही. तुमच्या स्वभावामुळे तुम्ही तुमचेच नाही तर सोबत कुटुंबाचं भविष्यही पणाला लावत आहात हे विसरु नका.


प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com



## अर्थसाक्षर स्पर्धा : १७

### निकाल पुढील प्रमाणे

**प्रश्न क्र. १. युक्रेन आणि रशियाकडून गहू आयात करणाऱ्या कोणत्या देशाने आता भारताकडून गहू आयातीचा निर्णय घेतला आहे?**

***इ.*** इजिप्त

**प्रश्न क्र. २. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी काढावे लागणारे डीमॅट खाते कोणत्या संस्था देतात?**

***ई.*** एनएसडीएल आणि सीडीएसएल

**प्रश्न क्र. ३. आठ एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात भारताकडे परकीय चलनाचा साठा किती होता?**

***अ.*** ६०४ अब्ज डॉलर

**अर्थसाक्षर स्पर्धा १७च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा १७साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**

***अ.*** गृह कर्ज ***आ.*** कारवरील कर्ज
***इ.*** क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज ***ई.*** इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**२. शेअर बाजाराच्या गुंतवणुकीचा लाभ घेण्यासाठीचा सर्वात सुरक्षित मार्ग कोणता?**

***अ.*** डे ट्रेडिंग ***आ.*** पोझिशनल ट्रेडिंग
***इ.*** फ्युचर अँड ऑप्शन ***ई.*** म्युच्युअल फंड

**३. उत्पन्न सुरु झाल्यावर सर्वात आधी कोणती गुंतवणूक केली पाहिजे?**

***अ.*** आरोग्य विमा ***आ.*** घर खरेदी
***इ.*** एलआयसी पॉलिसी ***ई.*** शेअर बाजार

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# नागोठणे शहराचा विकास करणार

## आमदार रविशेठ पाटील यांची ग्वाही

**नागोठणे : प्रतिनिधी**

आपण आमदार असेपर्यंत नागोठणे गावातील विकासाचे एकही काम शिल्लक राहणार नाही. या गावाच्या विकासाबाबत कुठेही कम तरता भासू देणार नाही, अशी ग्वाही आमदार रविशेठ पाटील यांनी गुरुवारी (दि. २१) नागोठणे येथे दिली.

स्थानिक आमदार विकास कार्यक्रम अंतर्गत विकास कामांचा लोकार्पण व भूमिपूजन सोहळा गुरुवार २१ एप्रिल रोजी सायंकाळी माजी मंत्री आमदार रवी शेठ पाटील यांच्या शुभहस्ते शिवसेना नेते रा जि प सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली



(छाया : राज वैशंपायन)

स्थानिक आमदार विकास कार्यक्रम अंतर्गत नागोठणे शहरातील विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते गुरुवारी सायंकाळी झाले. त्यानंतर भाजपच्या जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे यांच्या निवासस्थानी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात आमदार रविशेठ पाटील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते. वीस वर्षे प्रलंबित असलेला नागोठण्याच्या शुध्द पाण्याचा प्रश्न लवकरच सोडविण्याचे आश्वासन आमदार पाटील यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश कांबळे यांनी केले. माजी सभापती मारुती देवरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. मनिषा कुंटे, नागोठणे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच मोहन नागोठणेकर, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंके, मीनाक्षी गोरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शहराध्यक्ष सचिन मोदी, उपाध्यक्ष गौतम जैन, ज्येष्ठ कार्यकर्ते सिराज पानसरे, भाई पानसरे, शामकांत नेरपगार, विवेक रावकर, सुभाष पाटील, पिगोंडे ग्रामपंचायत माजी उपसरपंच राजेंद्र लवटे, विठोबा माळी, शेखर गोळे, मोरेश्वर म्हात्रे, शिवसेना शाखाप्रमुख धनंजय जगताप, अनिल महाडिक, संजय नांगरे, भाजपच्या महिला पदाधिकारी माधुरी रावकर, प्रियंका पिंपळे, मुग्धा गडकरी, शीतल नांगरे, सुखदा वढावकर, सोनाली पडवळ आदींसह भाजप, शिवसेनेचे कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड यांनी आभार मानले.

# सख्या भावाची हत्या, आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

## अलिबाग सत्र न्यायालयाचा निर्णय

**अलिबाग : प्रतिनिधी**

किरकोळ वादातून सख्या भावाची हत्या करणाऱ्या आरोपीला अलिबाग सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली, दहा हजार रुपयांचा दंडही ठोठावला. वासुदेव एकनाथ नाईक असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

सदर घटना पेण तालुक्यातील निगडे आदिवासी वाडी येथे ७ फेब्रुवारी २०२१ रोजी घडली होती. एकनाथ चिमा नाईक यांच्या घरात मयत सुनील नाईक आणि वासुदेव नाईक हे सख्खे भाऊ एकत्र राहत होते. दोन्ही भावांमध्ये सातत्याने वादविवाद आणि भांडणे होत होती. याच भांडणाच्या रागातून वासुदेव नाईक यांनी घरातील कोयत्याने सुनिल नाईक यांच्या डोक्यात आणि मानेवर वार करून ठार मारले होते. या प्रकरणी वडिल एकनाथ चिमा नाईक यांच्या तक्रारीनुसार वडखळ पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वडखळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक बी. आर. कुंभार यांनी या प्रकरणाचा तपास करून अलिबाग सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी अतिरीक्त सत्र न्यायाधीश अशोककुमार भिल्लारे यांच्या न्यायालयात झाली. यावेळी शासकीय अभियोक्ता म्हणून जिल्हा सरकारी वकील भुषण साळवी यांनी काम पाहिले. सुनावणी दरम्यान एकूण आठ साक्षी नोंदविण्यात आल्या. यात फिर्यादी एकनाथ नाईक, आकाश नाईक, तुकाराम नाईक आणि पोलीस निरीक्षक बी. आर. कुंभार यांच्या साक्षी महत्वपुर्ण ठरल्या.

दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने शासकीय अभियोक्ता भुषण साळवी यांचा युक्तीवाद ग्राह्य धरला आणि आरोपी वासुदेव नाईक याला सख्या भावाचा खून केल्या प्रकरणी दोषी ठरविले.

# म्हसळ्याला भारनियमनाची झळ

## रोज किमान २.३० तास होणार लोडशेडिंग

**म्हसळा : प्रतिनिधी**

वीज आणि कोळशाच्या टंचाईमुळे लोडशेडिंगला सुरुवात झाली असून राज्यात भारनियमनाचे संकट वाढत आहे. त्यामुळे जिथे वीजेची तूट, वीजबिलांची वसुली कमी झाली आहे तिथे लोडशेडिंग करण्यात येणार आहे. त्यामुळे म्हसळ्यातील बहुतांश भागांत किमान २.३० तास भारनियमन रहाणार असल्याची माहिती महावितरणच्या आधिकाऱ्यानी दिली.

ज्या ठिकाणी रिकव्हरी कमी होते, त्या ठिकाणी भारनियमन जास्त करण्याचे सूत्र आहे. वीज चोऱ्या करणाऱ्या ठिकाणी भारनियमन जास्त प्रमाणात रहाणार असल्याचे सांगण्यात आले. विजेची तूट आणि वसुली यावर आधारित ए ते जी तीन असे ग्रुप रहाणार आहेत. त्या भागांत किमान १.३० ते ५ तास भारनियम होणार असल्याचे सांगण्यात आले. म्हसळा तालुक्याचा मुख्यभाग सी कॅटेगरीत असून लॉस आणि वसुलीची तूट पहाता २६ते ३४ टक्के प्रमाण आहे. त्यामुळे म्हसळ्यातील बहुतांश भागात किमान २.३० तास भारनियमन रहाणार आहे. सध्या ते सी–१ कॅटेगरीत असून भारनियमन आवश्यकतेप्रमाणे सकाळी ११ ते १२.३० आणि सायंकाळी ४ ते ५ यावेळी होणार असल्याचे महावितरणचे म्हसळा येथील कार्यकारी अभियंता प्रदीप पटवारी यानी सांगितले.

# पेट्रोल पंपाची जागा पालिकेने तत्काळ ताब्यात घ्यावी

## खोपोली शहर मनसेची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

(छाया : विनायक माडपे)



**खोपोली : प्रतिनिधी**

खालची खोपोली येथील अग्निशामक दलाजवळ नगरपालिकेच्या मालकीची जागा आहे, ही जागा इसार पेट्रोल पंपासाठी भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. मात्र तो पेट्रोल पंप महिन्यातून २० दिवस बंद असतो. त्यामुळे सदरची जागा नगरपालिका प्रशासनाने तात्काळ ताब्यात घ्यावी, अशी मागणी खोपोली शहर मनसेच्या वतीने नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पुर्वी खोपोली शहरातील वाहन मालकांना पेट्रोल भरण्यासाठी तीन किलोमीटर अंतरावरील शिळफाटा येथे जावे लागत होते. त्यात वेळ आणि आर्थिक नुकसान होत होते. त्यामुळे खोपोलीकरांच्या मागणीवरून नगरपालिका प्रशासनाने खालची खोपोली येथील जागा इसार पेट्रोल पंपासाठी भाडेतत्त्वावर दिली. पण महिन्यातील वीस दिवस हा पेट्रोल पंप बंद असतो, त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. खोपोलीतील वाहन मालकांना पेट्रोल घेण्यासाठी पुन्हा शिळफाटा येथे जावे लागत आहे.

नागरिकांच्या सोईसाठी खालची खोपोली येथील जागा नगरपालिकेने इसार पेट्रोल पंपाला भाडेतत्त्वावर दिली होती. मात्र नागरिकांची गैरसोय होऊ लागल्याने सदर पेट्रोल पंपाची जागा नगरपालिका प्रशासनाने ताब्यात घेऊन विकसित करावी व अन्य व्यवसायला ही जागा द्यावी. त्यामुळे नगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल, असे मनसेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हा संघटक संजय तन्ना यांनी हे निवेदन खोपोली नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले. या वेळी मितेश शहा, बाळा दर्गे, संजय दळवी, सतिष येरुणकर इत्यादी मनसे पदाधिकारी उपस्थित होते.

# लोणेरे येथील डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाकडून विद्यार्थीहिताच्या मागण्या मान्य

## अभाविपच्या ठिय्या आंदोलनाला यश



**अलिबाग : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र त्यांच्या संबंधित महाविद्यालयामध्येच उपलब्ध करून देण्यात यावे, या व विद्यार्थी हिताच्या अन्य म ागण्यांसाठी अभाविपने ठिय्या आंदोलन केल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाकडून अभाविपने केलेल्या विद्यार्थी हिताच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या.

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात अभाविप (अखिल भारतीय विद्यार्थी परिषद) च्या नामफलकाचे अनावरण कोंकण प्रदेशमंत्री अमित ढोमसे यांच्या हस्ते १९ एप्रिल रोजी करण्यात आले. त्यानंतर २० एप्रिल २०२२ रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांना अभाविप शिष्टमंडळाने विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत निवेदन दिले होते. या निवेदनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे संलग्न सर्व महाविद्यालयाचे गुणपत्रिका व प्रमाणपत्र हे संबंधित म हाविद्यालयातच देण्याची व्यवस्था करावी, विद्यापीठ कॅम्पसमधील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयांची वेळ वाढवावी, खेळाच्या मैदानाची व्यवस्था करावी, विद्यापीठाच्या सर्व हेल्पलाईन या तात्काळ सुरू कराव्यात, विद्यापीठाची वेबसाईट अपडेट करून सर्व आवश्यक माहिती वेबसाईटवर प्रसारित करावी, या मागण्यांचा समावेश होता. मात्र विद्यापीठ प्रशासनाने या मागण्यांवर ठोस कार्यवाही केली नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या कार्यकारी समि तीची बैठक सुरू असताना अभाविपच्या वतीने तब्बल सहा तास ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनानंतर विद्यापीठ प्रशासनाकडून अभाविपने केलेल्या विद्यार्थी हिताच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या.

# नेरळ–कळंब राज्यमार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम पुन्हा सुरु

(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : बातमीदार**

माथेरान–नेरळ–कळंब या राज्यम ार्गावरील नेरळ साई मंदिर नाक्यावरील रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे काम मंजूर आहे. मात्र या ९०० मीटर लांबीच्या रस्त्याचा चार मीटर लांबीच्या भागाचे काँक्रीटीकरण झाल्यांनतर महिनाभर काम बंद होते. ते पुन्हा सुरु झाले आहे. पावसाळ्यापूर्वी या संपुर्ण रस्त्याचे काँक्रीटीकरण होणार काय? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

नेरळ साई मंदिर नाका ते कळंब या ९०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्यापैकी चार मीटर भागात एक लेनचे काँक्रीटीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण केले आहे. त्याची दुसरी बाजू आणि उर्वरित रस्त्याचे काम कधी पूर्ण होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाळा दोन महिन्यावर आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदार कंपनीला पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करून घेण्यासाठी सूचना करण्याची गरज आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने काँक्रीटकरणाचे काम तात्काळ हाती घेण्याची मागणी नेरळ येथील जय मल्हार रिक्षा संघटनेचे अध्यक्ष श्रावण जाधव आणि इको रिक्षा संघटनेचे अध्यक्ष केशव तरे यांनी केली आहे.

# बेडीसगावचा खोदलेला रस्ता जैसे थै!

## आदिवासींची शासनाकडून फसवणूक, महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार उपोषण

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील बेडीसगाव येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या मालकीचा रस्ता जेसीबी मशीनच्या सहाय्याने खोदून गायब करण्यात आला होता. त्यानंतर जुना रस्ता पुन्हा तयार करून द्यावा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी ४ एप्रिलपासून आमरण उपोषण सुरू केले होते. त्यावेळी सात दिवसात रस्ता तयार करण्याचे लेखी आश्वासन जिल्हा परिषदेने दिल्याने उपोषण स्थगित करण्यात आले होते. मात्र शासकीय यंत्रणेकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने आदिवासी सेवा संघाचे कार्यकर्ते म हाराष्ट्र दिनापासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर उपोषण करणार आहेत.

कर्जत तालुक्यातील बेडीसगाव येथील नऊ आदिवासी वाड्यांकडे जाणाऱ्या रस्त्याचा १४० मीटर लांबीचा भाग वांगणी गावातील अज्ञात व्यक्तींनी जेसीबी मशीनच्या सहाय्याने गायब केला होता. त्यानंतर जुना रस्ता पुन्हा तयार करावा, यासाठी आदिवासी ग्रामस्थांनी संबंधीत शासकीय कार्यालयांना विनंती अर्ज दिले आहेत. मात्र रस्त्याचा काही भाग गायब करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली नाही.



तर रस्ता तयार करण्याबाबतदेखील शासकीय यंत्रणेकडून कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यामुळे आदिवासी सेवा संघाच्या तीन कार्यकर्त्यांसह आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांनी ४ एप्रिलपासून आमरण उपोषण सुरू केले. त्यानंतर शासकीय यंत्रणा कामाला लागली. सात दिवसात जुना रस्ता होता तसाच तयार करून देण्याचे लेखी पत्र जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र त्याला २० दिवसांचा कालावधी लोटला तरी बेडीसगावकडे जाणाऱ्या रस्त्याचा भाग संबंधितांनी तयार करून दिला नाही. त्यामुळे शासनाकडून आपली फसवणूक झाल्याची भावना बेडीसगाव परिसरातील आदिवासी बांधवांत निर्माण झाली आहे.

दरम्यान, आपला जुना रस्ता पुन्हा तयार करून द्यावा आणि रस्ता खोदणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, या म ागणीसाठी आदिवासी सेवा संघाचे रायगड जिल्हा सचिव गणेश पारधी, कर्जत तालुका अध्यक्ष जैतू पारधी आणि बेडीसगाव येथील ग्रामस्थ मंगळ दरवडा हे महाराष्ट्र दिनी (१ मे) अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर उपोषण करणार आहेत.

# रोह्यात सायबर क्राईममुक्त अभियान राबवणार

## –पोलीस निरिक्षक प्रमोद बाबर

**रोहे : प्रतिनिधी**

आज सर्वत्र ऑनलाईनद्वारे आर्थिक फसवणूक व अन्य सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी जिल्हा सायबर क्राईममुक्त करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने रोहा तालुका सायबर क्राईममुक्त अभियान राबवणार असल्याचा मनोदय रोहा पोलीस ठाण्याचे नवनियुक्त निरीक्षक प्रमोद बाबर यांनी शुक्रवारी (दि. २२) येथे व्यक्त केला.



प्रमोद बाबर यांची रोहा पोलीस ठाण्याचे निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पदभार स्वीकारल्यानंतर शुक्रवारी सायंकाळी त्यांनी रोह्यामधील पत्रकारांशी संवाद साधला. पोलीस प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी आपले सायबर क्राईमपासून संरक्षण करावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

माहिती व तंत्रज्ञानाच्या या युगात नेट बँकिंग व सोशल मीडियाची विविध माध्यमे प्रत्येकाला गरजेची आहेत. मात्र या माध्यमातून प्रलोभने व आमिषे दाखवून फसवणूक करण्याचे प्रकारही वाढत आहेत. यावर आळा बसावा व ही माध्यमे वापरताना घ्यावयाची खबरदारी याविषयी पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेनुसार रोहा शहर व परिसरात जनजागृती करण्यात येणार आहे. सायबर क्राईम मुक्त रोहा पोलीस स्थानक बनविण्याच्या अभियानास नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमोद बाबर यांनी केले.

# नवी मुंबईत मुलांच्या लसीकरणाला वेग

## २०८ शाळांत केंद्रे; ३६,८२१ जणांना पहिली तर ६,५२४ जणांना दुसरी पहिली मात्रा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून शांत झालेल्या कोरोनाच्या प्रादूर्भावाने पुन्हा डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नवी मुंबई पालिका प्रशासनाने १२ ते १४ वयोगटातील लसीकरणावर भर दिला असून मुलांच्या लसीकरणाला वेग आला आहे. यासाठी पालिकेकडे ९२,८०० लसमात्रा मिळाल्या असून सुमारे ४३,३४५ लसमात्रांचे लसीकरण केले आहे. यासाठी पालिका प्रशासनाने महापालिकेच्या रुग्णालयांसह पालिका व खासगी शाळा मिळून २०८ शाळांत लसीकरण केंद्रे सुरू केली आहेत.

१६ मार्चपासून या वयोगटासाठी लसीकरण सुरू करण्यात आले असून ४७,४५९ लाभार्थी असून पहिली मात्रा ३६,८२१ तर दुसरी मात्रा ६,५२४ जणांना देण्यात आली आहे. नवी मुंबई महापालिकेने लसीकरणाच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य नियोजन केल्यामुळे १८ वर्षांवरील वयोगटात लसीकरणाचे पहिल्या व दुसऱ्या मात्रेचे १०० टक्के उद्दिष्ट गाठले आहे. तसेच १५ ते १८ या वयोगटातील मुलांचे लसीकरणही पूर्ण केले आहे. आता १२ ते १४ वयोगटातील लसीकरणावर भर दिला आहे.

पहिल्या मात्रेचे लसीकरण शेवटच्या टप्प्यात आल्यानंतर गेल्या आठवड्यात बुधवारपासून दुसरी लसमात्रा देणे सुरू केले. मात्र पहल्या दिवशी एकही लाभार्थी लसीकरण केंद्राकडे फिरकला नाही. त्यानंतर पुढील दोन ते चार दिवस अत्यंत कमी लसीकरण होत होते. मात्र देशात पुन्हा करोना रुग्णवाढीचे संकेत मिळाल्यानंतर या लसीकरणाला गर्दी होऊ लागली आहे. गुरुवारपर्यंत (दि. २१) ६,५२४ जणांना दुसरी लस देण्यात आली आहे.

यासाठी पालिका प्रशासनाने महापालिकेच्या रुग्णालयांसह पालिका व खासगी शाळा मिळून २०८ शाळांत लसीकरण केंद्रे सुरू केली असून लसीकरणाला वेग आला आहे.

**लहान मुलांच्या वेगवान लसीकरणासाठी पालिकेने २०४ शाळांमध्ये लसीकरणाचे नियोजन केले असून पालिकेला आतापर्यंत ९२,८०० कोर्बेवॅक्स लसमात्रा मिळाल्या आहेत. मागील काही दिवसांपासून दुसऱ्या लसमात्रेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

**–डॉ. रत्नप्रभा चव्हाण, लसीकरण प्रमुख**

## पनवेल तालुका पोलीस पथकाकडून रूट मार्च



**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रासह देशभरात होत असलेल्या विविध घटनांच्या पार्श्वभूमीवर सतर्कता म्हणून पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी वावंजे येथे जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम केली.

पोलीस उपायुक्त परिमंडळ २ चे शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे वावंजे याठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या नेतृत्वाखाली जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. सदर दंगा काबू योजनेच्या रंगीत तालमीत दोन पोलीस निरीक्षक, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक, दोन पोलीस उपनिरीक्षक, १५ पोलीस अंमलदार तसेच तळोजा एमआयडीसीकडील अग्निशमन दलाचे एक अधिकारी, पाच फायरमॅन टेंडर व्हेन व ॲम्ब्युलन्स सहभागी झाले होते.

## आमदार प्रशांत ठाकूर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमाची क्षणचित्रे


















# जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये आज ग्रामसभा

## गावांच्या विकासासाठी नऊ कलमी कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

खेडेगावांच्या शाश्वत विकासासाठी नऊ कलमी कार्यक्रम राबविण्याचे धोरण केंद्र सरकारने निश्चित केले आहे. या कार्यक्रमाची चालू आर्थिक वर्षापासून अंमलबजावणी करण्याच्या सूचना राज्यांना दिल्या असून, देशातील सर्व गावांचा २०३०पर्यंत शाश्वत विकास करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. या नवीन ध्येय निश्चितीसाठी केंद्राने राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानात सुधारणा केली आहे. त्यानुसार पंचायत राज दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. २४) रायगड जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी दिली.



भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाअंतर्गत गावांच्या शाश्वत विकासासाठी २४ एप्रिल या पंचायत राज दिनाचे औचित्य साधून, रायगड जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे. आयोजित केलेल्या ग्रामसभेत नऊ कलमी कार्यक्रमापैकी किमान एक संकल्प व अधिक तीन संकल्प राबविण्याचा ठराव ग्रामसभेत पारित करायचा आहे. केंद्र शासनाच्या नऊ कलमी कार्यक्रमाची चालू आर्थिक वर्षापासून अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.


या ग्रामसभेच्या आयोजनाबाबत रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**■ नऊ कलमी कार्यक्रम**

*गरीबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृध्दीस पोषक गाव, आरोग्यदायी गाव, बालस्नेही गाव, जल समृद्ध गाव, स्वच्छ व हरित गाव, पायाभूत सुविधायुक्त स्वयंपूर्ण गाव, सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव, सुशासन युक्त गाव, लिंग समभाव पोषक गाव.*

**■ शेतकर्‍यांना मिळणार किसान क्रेडिट कार्ड**

*केंद्रीय कृषि व किसान कल्याण मंत्रालयाच्या वतीने पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्डचे वितरण करण्यासाठी 'किसान भागिदारी प्राथमिकता हमारी' अभियान राबवण्यात येणार आहे. सदर अभियान २४ एप्रिल ते १ मे या कालावधीत राबवण्यात येणार आहे. यासाठी रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजनही करण्यात येणार आहे. तसेच ज्या पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत किसान क्रेडिट कार्ड मिळालेले नाहीत, अशा सर्व लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.*




## कर्जत रेल्वे स्थानकात फलाट क्र. १वर बसविले डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवर गाड्यांच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविण्यात आले आहेत. कर्जत रेल्वे स्थानकात डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविणात यावेत यासाठी रेल्वे प्रशासनाकडे गेल्या दोन वर्षापासून पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले.

कर्जत स्थानकात आरक्षण केल्यानंतर गाडी पकडण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. कधी आपला आरक्षित डबा शोधण्याच्या नादात गाडी चुकायची तर कधी समान फलाटवरच रहायचे तर काही वेळा डबा पकडण्याच्या नादात अपघातही झाले आहेत. त्यामुळे कर्जत रेल्वे स्थानकात एक्सप्रेस गाड्याच्या बाबतीत डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्यात यावेत. यासाठी सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल गेल्या दोन वर्षापासून रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करीत होते.




(छाया : विजय मांडे)

सुरुवातीला कर्जत रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस गाड्याच्या डब्यांची स्थिती दर्शविणाऱ्या छोट्या डिजिटल इंडिकेटर्सची गरजच नाही, असे रेल्वे प्रशासनाकडून कळविण्या आले होते. त्यावर ओसवाल यांनी कर्जत रेल्वे स्थनाकात डब्यांची स्थिती दर्शविणाऱ्या डिजिटल इंडिकेटर्सची का आवश्यकता आहे, हे पटवून दिले. व या बाबतीत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरूच ठेवला. रेल्वे प्रशासन प्रत्येक वेळी नकारार्थी उत्तर देत गेले. शेवटी रेल्वे प्रशासने या बाबतीत मंजुरी दिली. त्यानुसार कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवर गाड्याच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. फलाट क्रमांक दोनवरसुद्धा इंडिकेटर्स बसविण्याचे काम सुरू आहे, तेही येत्या काही दिवसात पूर्ण होईल.

> **कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवर एक्सप्रेस गाड्याच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत व येत्या काही दिवसात फलाट क्रमांक दोनवरचे कामसुद्धा पूर्ण होईल.**
> **-पंकज मांगीलाल ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**

## गाळ काढणाऱ्या यंत्रणेला केलेल्या कामाचे पैसे न दिल्याने आंदोलनाची भूमिका

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यात अतिवृष्टीत झालेले नुकसान भविष्यात टाळण्यासाठी शासन दरबारी कांही उपाययोजना सुचवण्यासाठी पूर नियंत्रण समिती स्थापन झाली. या समितीने केलेल्या मागणीनुसार गाळ काढण्याच्या कामाला शासनाने सुरवात केली मात्र दोन महिन्यापासून एक रुपयाही न दिला गेल्याने गाळ काढणाऱ्या यंत्रणेने हे काम थांबवले. यामुळे गाळ काढणाऱ्या यंत्रणेला कामाचे पैसे द्यावे अन्यथा आंदोलनाची भूमिका घेतली जाईल असा इशारा समितीच्या वतीने आमदार भरत गोगावले यांनी दिला.

महाड तालुक्यात २०२१ मध्ये महापूर आला होता. त्यात मोठी वित्त हानी झाली होती. गेली अनेक वर्षे महाडकर पुराच्या पाण्याचा सामना करत आहेत. याबाबत ठोस उपाययोजना केल्या जाव्यात याकरिता काही नागरिकांनी एकत्रित येवून पूर नियंत्रण समिती स्थापन केली. या समितीच्या मागणीनुसार गाळ काढण्याच्या कामाला सुरवात झाली. मात्र दोन महिने होवूनदेखील गाळ काढणाऱ्या ठेकेदारांना पैसे मिळत नसल्याने त्यांनी शनिवारपासून काम थांबवले आहे. हे काम थांबल्याने समितीकडून जलसंपदा विभागला इशारा देण्यात आला आहे. याबाबत आमदार भरत गोगावले यांनी एक पत्रकार परिषद घेवून शासनाने गाळ काढणाऱ्या यंत्रणेला पैसे दिले पाहिजेत शिवाय सावित्री नदीमधील बेट काढण्याच्या कामालादेखील त्वरित सुरवात केली पाहिजे असे सांगितले.




■ महाडमधील पूर नियंत्रण समितीचा निर्णय

(छाया : महेश शिंदे)

**दोन दिवसात ठेकेदारांना पैसे मिळणार**

महाड शहराजवळ सावित्री नदीत तर वारंगी, वाळणजवळ काळ नदीत, शिवथरघळ, बिरवाडी, पोलादपूर तालुक्यातील सवाद, वरंध आदी ठिकाणी गाळ काढण्याचे काम सुरु आहे. याकरिता जलसंपदा विभागानेदेखील डंपर, जेसीबी आदी यंत्रणा कार्यरत असून खाजगी यंत्रणादेखील मोठ्या प्रमाणात वापरली आहे.

जलसंपदा विभागाने महसूल विभागाकडे एक कोटी रुपये जमा केले होते, यापैकी सात लाख इंधनाचे पैसे दिले आहेत अशी माहिती जलसंपदा विभागाने देवून ९३ लाख रुपये शिल्लक असल्याचे स्पष्ट केले.

## सुधागड पालीत प्लास्टिकचा पुनर्वापर

**पाली : प्रतिनिधी**

पालीतील कॅफ ` बिग ब्ल्यू मारबलमध्ये प्लास्टिकचा अविघटनशील कचरा पुनर्वापर करण्यासाठी पाठविला जात आहे. शिवाय येथील बहुतांश वस्तू या पर्यावरणपूरक असून विघटनशील आहेत. येथील कचऱ्याचा वापर खत बनविण्यासाठी केला जातो. या सर्व उपक्रमामुळे हे कॅफे सुधागड तालुक्यातील एकमेव झिरो वेस्ट कॅफे ठरले आहे.

कॅफे बिग ब्ल्यू मारबलमध्ये कोल्ड कॉफी किंवा अन्य गोष्टींसाठी लागणाऱ्या दुधाच्या पिशव्या साठवून त्या धुवून स्वच्छ केल्या जातात. त्यानंतर या हजारो पिशव्या पुनर्वापरासाठी मुंबईत पाठवल्या जातात.



(छाया : धम्मशील सावंत)

येथील कर्मचारीसुद्धा या कामात उत्स्फुर्त सहभाग घेत आहेत.

यामध्ये कॅफेच्या संचालिका सुरभी मोरे यांच्यासह कर्मचारी दर्शना शिंदे आणि हर्षदा गोळे या दोघीदेखील प्लास्टिक टाळण्यासाठी मोठा हातभार लावत आहेत. कोणी प्लास्टिक आणून दिल्यास ते पुनर्वापरासाठी निशु:ल्क पाठविले जाईल, असे सुरभी मोरे यांनी सांगितले.

> **प्लास्टिक आणि त्याच्या उत्पादनांनी आपले जीवन सुकर केले होते. मात्र प्लास्टिक आता शाप ठरू लागले आहे. त्यामुळे रोजच्या वापरातील प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.**
> **-सुरभी मोरे, संचालिका, कॅफ बिग ब्ल्यू मारबल, पाली ता. सुधागड**

## बोरगाव गावाजवळील कालव्यात सापडला मृतदेह; खुनाचा गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरगावजवळील कालव्यमध्ये ६० वर्षीय इसमाचा मृतदेह सापडल्याने या भागात खळबळ उडाली आहे.

बोरगाव गावातील पांडुरंग लहू भडकले (वय ६०) यांचा मृतदेह गावाजवळील कालव्यामध्ये पडला असल्याचे एका इसमाने पाहिले व त्यांच्या नातेवाईकांना खबर दिली. यानंतर घटनस्थळी पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. शवविच्छेदन अहवालात पांडुरंग भडकले यांच्या डोक्यात मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी अज्ञात इसम ांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास निरीक्षक देवेंद्र पोळ हे करीत आहेत.

## रोहा तालुक्यातील २६ गाव योजनेतील पाणी मुरते कुठे?

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंडलिका नदीच्या तीरावर असलेल्या गावांना पाणीटंचाईची झळ पोहोचत आहे, ही मोठी शोकांतिका आहे. हक्काची २६ गाव पाणीपुरवठा योजना असताना आता या गावांना टँकरने पाणीपुरवठा होत असल्याने या गावांना मिळणारे पाणी जाते कुठे? असा सवाल ग्रामस्थांतून विचारला जात आहे.

रोहा तालुक्यातील बहुतांशी गावे विशेषत: कुंडलिका नदीच्या दोन्ही तिरावरील गावे नदीचे पाणी पिण्यासाठी वापरत होते. कालांतराने धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यांच्या सांडपाण्यामुळे कुंडलिका नदी व त्यावर अवलंबून असलेले नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत दुषित झाले. त्यामुळे नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या गावांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला. आमचे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत दुषित केल्याने आम्हाला एमआयडीसीने पाणीपुरवठा करावी, अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर एमआयडीसी व एमजीपीच्या सहकार्याने २६ गाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली. ही योजना जिल्हा परिषदकडे वर्ग करणे आवश्यक होते.परंतु अद्याप हा विषय सुटलेला नाही.

२६ गाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आल्यानंतर पडम, खारापटी, निडी, भातसई, झोळांबे, लक्ष्मीनगर, शेणवई, डोंगरी, शेणवई आदिवासीवाडी, वावेखार, वावेपोटगे, यशवंतखार, सानेगाव, दापोली, कोपरी, धोंडखार या गावांना काहीकाळ सुरळीत पाणीपुरवठा होऊ लागला. परंतु पुढे काही कालावधीनंतर व आता या गावांना पिण्याचे पाणी मिळत नाही. त्यामुळे या गावांना पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या योजनेसंदर्भात रो तहसील, प्रांत कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक बैठका झाल्या. परंतु कोणतेही सकारात्मक फलीत पुढे आले नाही. आज भातसई, झोळांबे, लक्ष्मीनगर, शेणवई आदिवासीवाडी, शेणवई, डोंगरी, वावेखार, वावेपोटगे, सानेगाव, दापोली, कोपरी, करंजवीरा या गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

२६ गाव पाणीपुरवठा योजनेतून सुरुवातील पाणी मिळत होते. आजही एमआयडीसीकडून १० लक्ष लिटर पाणीपुरवठा होत असताना हे पाणी या योजने अंतर्गत असलेल्या गावांना पोहचत नाही. एमआयडीसीकडून पाणी येते परंतु ते पडम गावापर्यंत का पोहचत नाही? असा सवाल ग्रामस्थांतून विचारला जात आहे. पडमपर्यंत असलेल्या जलवाहिनीमधून हे पाणी कुठे मुरते, यांचा शोध गेली ५-६ वर्षे एमआयडीसी आणि महसुल प्रशासन घेत आहेत. पाणी कुठे मुरते, यांचा शोध घेवून पाणीपुरवठा सुरळीत करु, असे आश्वासन अनेक बैठकांत देण्यात आले, परंतु अद्याप यांचा शोध लागला नाही.

या गावांना टँकरने पाणीपुरवठा करणे हा कायम स्वरूपी उपाय नसून शासनाने त्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा या गावातील ग्रामस्थ आंदोलन केल्याशिवाय गप्प बसणार नाहीत, एवढे निश्चित.

## पर्यावरण व्यवस्थापन काळाची गरज


मानवी कृतींमुळे पर्यावरणाची घटलेली गुणवत्ता वाढविणे व पर्यावरणाची स्थिती सुधारणे या ध्येयांसाठी जाणीवपूर्वक केलेली कृती. पर्यावरणाच्या अवनतीमुळे सर्व सजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरणतज्ज्ञ, अभ्यासक, शासक, प्रशासक, सामाजिक तसेच राजकीय कार्यकर्ते या समस्यांवर विचारविनिमय करीत आहेत. त्यातूनच पर्यावरण व्यवस्थापन ही संकल्पना पुढे आली आहे. पर्यावरण व्यवस्थापन ही विकास व नियोजनाच्या संदर्भातील संकल्पना आहे. यात समाजाचा सर्वांगीण विकास करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचा समतोल वापर करून सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे, ही उद्दिष्टे अभिप्रेत आहेत. त्याचबरोबर मानवाच्या अविचारी कृतींवर नियंत्रण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पर्यावरणीय समस्यांच्या निवारणासाठी निर्धारित केलेली तत्त्वे यांचा पर्यावरण व्यवस्थापनात समावेश होतो. मानवाच्या सामाजिक व आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाची गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न यातून केला जातो.

पर्यावरण व्यवस्थापन ही मानव आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधणारी प्रक्रिया आहे. त्याद्वारे पर्यावरणाचे संतुलन बिघडू न देता व प्रदूषणविरहित पर्यावरण राखून मानवाचे हित साधण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यावरणाच्या आपत्तीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया ही पर्यावरण व्यवस्थापनाचे एक अंग असून यात नियोजन, विश्लेषण व मूल्यांकन यांच्या आधारे संसाधनांचा विचारपूर्वक उपयोग करण्याचे तंत्र वापरले जाते.

पर्यावरणाचे व्यवस्थापन विशिष्ट प्रदेश किंवा राष्ट्र यांच्याशी मर्यादित नसून ती संपूर्ण जगाची गरज आहे. भविष्यात मानवी समाजाच्या समन्यायक्षम उपयोगासाठी परिसंस्थांचे रक्षण करणे व परिसंस्थांतील अखंडत्व राखणे हे पर्यावरण व्यवस्थापनाचे ध्येय आहे.

**पर्यावरण व्यवस्थापनाची उद्दिष्टे**

पर्यावरणातील निरनिराळ्या घटकांचे संशोधन करणे.पर्यावरणाच्या नियोजनाची रूपरेषा तयार करणे. पर्यावरणाच्या विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे. मानवाला प्रदूषणाच्या परिणामांपासून वाचविणे. अवक्षय होत असलेल्या सजीवांना संरक्षण देणे. पर्यावरणाचा दर्जा राखला जावा म्हणून विशिष्ट नियमावली वा तत्त्वे ठरविणे. प्रदूषण नियंत्रणाद्वारे पर्यावरणाच्या गुणवत्तेचे रक्षण करणे. व्यवस्थापनासाठी उपायांचे समीक्षण करणे व त्यात सुधारणा करणे.



व्यवस्थापनासाठी नियोजित केलेल्या उपायांच्या परिणामांची तपासणी करणे. पर्यावरण व्यवस्थापनासाठी साहित्यसंग्रह करणे.

पर्यावरण शिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे. संसाधनांचा बहुउद्देशीय वापर करून पारिस्थितिकीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करणे. जैवविविधतेचे परिरक्षण करणे. स्वच्छ तंत्रज्ञान उत्पादन संकल्पना स्वीकारणे.

पर्यावरण संधारणासाठी नियम व कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणे.

**पर्यावरण व्यवस्थापनाचे धोरण**

हे ठरविताना पुढील घटकांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते. पर्यावरणीय अवनती टाळण्यासाठी हवा प्रदूषण, जलप्रदूषण व भूमिप्रदूषण यांवर प्रभावीपणे नियंत्रण आणणे व कार्यक्षम उपाय योजणे. ऊर्जा संसाधनांसह इतर सर्व संसाधनांचा अतिवापर टाळणे व टाकाऊ पदार्थांची कमीत कमी निर्मिती व्हावी यासाठी कमी खर्चिक परंतु कार्यक्षम तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे. शाश्वत विकासासाठी उत्पादन निर्मितीकरिता स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करणे. शाश्वत विकासासाठी पर्यावरण प्रभाव मूल्यांकन तपासणी, पर्यावरण व्यवस्थापन पद्धती, पर्यावरण जोखीम मूल्यमापन इत्यादी साधनांचा स्वीकार करणे. व्यापक स्तरावर पर्यावरणीय जगजागृती व्हावी यासाठी प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण समस्यांची समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे. शैक्षणिक स्तरावर पर्यावरण शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे. लोकसंख्या वाढीस प्रतिबंध व्हावा यासाठी योजना आखणे. सामाजिक समन्याय व्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी प्रयत्न करणे. पर्यावरणाच्या प्रमुख घटकांचे व्यवस्थापन- पर्यावरण हे जैविक तसेच अजैविक घटकांपासून बनलेले असते. असे व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे.

**-जयकुमार मगर**

आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य दिव्य राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# शिवशंकर, दसपटी, जयहिंद-धुळे, विजय क्लब यांची विजयी सलामी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवशंकर मंडळ, दसपटी मंडळ, जयहिंद मंडळ, विजय क्लब यांनी जय भवानी नवतरुण मंडळ आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक पुरुष राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली.

धरणा कॅम्प येथे शुक्रवारी सुरू झालेल्या पुरुषांच्या अ गटात कल्याण-ठाणे येथील शिवशंकर मंडळाने शनिवारी (दि. २३) दोन विजय मिळवित बाद फेरीतील आपला प्रवेश जवळपास निश्चित केला. पहिल्या सामन्यात शिवशंकरने मुंबई उपनगरच्या केदारनाथ मंडळाचा ४४-१४ असा पराभव केला. त्यानंतर झालेल्या सामन्यात नंदुरबारच्या एनटीपीएसचा ३२-२६ असा पाडाव करीत बाद फेरीच्या दृष्टीने आपली घोडदौड सुरू ठेवली. ब गटात चिपळूण-रत्नागिरीच्या दसपटी मंडळाने कल्याण-ठाण्याच्या ओम कबड्डी संघाला ३४-३१ असे नमवले. याच गटातील दुसऱ्या सामन्यात उपनगरच्या जॉली स्पोर्टसने मुंबईच्या गुड-मॉर्निंग स्पोर्ट्सचा ४४-२७ असा पराभव करीत आगेकूच केली.

क गटात धुळ्याच्या जयहिंद मंडळाने पुण्याच्या बाबुराव चांदेरे फाउंडेशनवर ४२-२२ असा सहज विजय मिळविला. याच गटात स्थानिक रायगडच्या मिडलाईन स्पोर्ट्सने मुंबई शहरच्या बंड्या मारुती संघावर ३०-२६ अशी मात केली. ड गटात मुंबई शहरच्या विजय क्लबने रायगडच्या पांडवादेवी संघावर २८-२३ असा विजय मिळविला.

याच गटातील दुसऱ्या सामन्यात सांगलीच्या शिवाजी व्यायाम मंडळाने उपनगरच्या स्वस्तिक मंडळावर ३०-२६ अशी मात करीत आगेकूच केली.

# राजस्थान पडले दिल्लीवर भारी!

## ■ १५ धावांनी विजय; बटलर ठरला किंगमेकर

**मुंबई : प्रतिनिधी**

जोस बटलरचे यंदाच्या ‘आयपीएल’मधील तिसरे शतक आणि २२ धावांत ३ बळी या बळावर राजस्थान रॉयल्सने शुक्रवारी (दि. २२) दिल्ली कॅपिटल्सवर १५ धावांनी विजय मिळवला.

दिल्लीने टॉस जिंकून प्रथम राजस्थानला फलंदाजीचे आमंत्रण दिले होते. राजस्थानने दोन बाद २२२ अशी आयपीएलमधील सर्वोत्तम धावसंख्या उभारली. यात बटलरने ६५ चेंडूंत नऊ चौकार आणि नऊ षटकारांच्या साहाय्याने ११६ धावा केल्या. याचप्रमाणे देवदत्त पडिक्कल ३५ चेंडूंत ७ चौकार, २ षटकारांसह ५४ धावांसमवेत १५.५ षटकांत १५५ धावांची सलामी दिली. संजू सॅमसनने नाबाद ४६ धावांचे योगदान दिले.

त्यानंतर, पृथ्वी शॉ (३७) आणि डेव्हिड वॉर्नर (२८) यांनी ४३ धावांची सलामी दिली. कर्णधार ऋषभ पंतने ४४ धावांसह धावसंख्येला आकार दिला. ललित यादव (३७) आणि रोव्हमन पॉवेल (१४ चेंडूंत ३६ धावा) यांनी उत्तरार्धात वेगाने धावा काढत विजयासाठी केलेले शर्थीचे प्रयत्न अपयशी ठरले.

जोस बटलरच्या शानदार शतकाच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत दोन गडी गमावून २२२ धावा केल्या. जोस बटलरशिवाय देवदत्त पडिक्कलनेही ५४ धावांची खेळी खेळली. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ आठ विकेट्सवर २०७ धावाच करू शकला आणि १५ धावांनी सामना गमावला.

### बटलरचे ‘आयपीएल’मधील तिसरे शतक



देवदत्त बाद झाल्यानंतर बटलरने या हंगामातील तिसरे शतक पूर्ण केले. त्याने ५८ चेंडूत १०० धावा केल्या. त्याने ० ते ५० धावांसाठी ३६ तर ५१ ते १०० धावांसाठी फक्त २१ चेंडू घेतले. देवदत्त बाद झाल्यानंतर बटलरने या हंगामातील तिसर शतक पूर्ण केले. त्याने ६५ चेंडूत ११६ धावा केल्या. यात ९ चौकार आणि ९ षटकारांचा समावेश होता. बटलरचा स्ट्राईक रेट १७८.४६ इतका होता.

# कर्णधाराचा ड्रामा दिल्लीलाच पडला महागात



**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्सच्या शुक्रवारी झालेल्या सामन्यात शेवटच्या षटकात नाट्यमय घडामोडी पहायला मिळाल्या. शेवटच्या सहा चेंडूंमध्ये जिंकण्यासाठी ३६ धावांचे आव्हान दिल्लीपुढे असताना वेस्ट इंडिजचा रोवमेन पॉवेलने तिसरा षटकार मारलेला चेंडू कमरेवर होता असे सांगत दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतसह दिल्लीच्या संघाने पंचांविरोधात मैदानातच गोंधळ घातला. त्यामुळे काही काळ खेळ थांबला, पण या दिरंगाईत पॉवेलला गवसलेली लय हरवली आणि राजस्थानने सामना जिंकला.

२० व्या षटकामध्ये दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला ३६ धावांची गरज होती. शेवटच्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर पॉवेलने षटकार लगावला, मात्र हा चेंडू उंचीला फलंदाजाच्या कंबरेच्या वर असल्याने तो नो बॉल आहे की, नाही यावरून वाद झाला. मैदानावरील पंचांनी नो बॉल देण्यास नकार दिला. यामुळे नाराज ऋषभ पंतने मैदानातच विचित्र भूमिका घेतली. चेंडूची उंची पाहता तो नो बॉल असायला हवा होता असे पंतचे मत होते. पंत एवढा नाराज होता की, त्याने रागात दिल्ली कॅपिटल्सच्या दोन्ही फलंदाजांना सामना सोडून मैदानाबाहेर येण्यास सांगितले.

दिल्लीचे प्रशिक्षक प्रवीण आम्रे यांनी मैदानात धाव घेतली. त्यांनी पंचांना चेंडू नो बॉल असल्याचे मैदानात येऊन सांगितले. दिल्लीच्या संघातील अन्य प्रशिक्षकांनी पंतला शांत करत सामना सुरू ठेवण्यासाठी मध्यस्थी केली. पंत हा पंचांच्या निर्णयावर नाराज होता, मात्र पंतने घेतलेल्या भूमिकेमुळे पॉवेलला गवसलेली लय तो गमावून बसला आणि दिल्लीने सामनाही गमावला.

# बुद्धिबळपटू गुकेशची क्रमवारीत विक्रमी झेप



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा १५ वर्षीय ग्रँडमास्टर डी. गुकेशने मेनोर्का खुल्या बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत जॉर्जियाच्या निनो बात्सिएश्विलीला पराभूत केले. या निकालानंतर गुकेशचे एलो २६५१.४ गुण झाले असून जागतिक क्रमवारीत त्याने अव्वल १०० बुद्धिबळपटूंमध्ये झेप घेतली आहे. ही कामगिरी करणारा तो सर्वात युवा भारतीय ठरला आहे.

जागतिक क्रमवारीत अव्वल १०० बुद्धिबळपटूंमध्ये प्रवेश मिळवणारा सर्वात युवा भारतीय खेळाडू ठरताना गुकेशने पाच वेळा विश्वविजेत्या विश्वनाथन आनंदचा विक्रम मोडीत काढला. आनंदने सप्टेंबर १९८७ मध्ये ही कामगिरी केली होती आणि त्या वेळी तो १७ वर्षांचा होता. जागतिक क्रमवारीत अव्वल १०० बुद्धिबळपटूंमध्ये सध्या गुकेश आणि आनंदसह एकूण सात भारतीयांचा समावेश आहे.

गुकेशने काही दिवसांपूर्वीच स्पेन येथे झालेल्या ४८व्या ला रोडा आंतरराष्ट्रीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले होते. त्यानंतर त्याने मेनोर्का स्पर्धेतही आपली दमदार कामगिरी सुरू ठेवली आहे. तीन फेऱ्यांअंती तो अन्य १० खेळाडूंसह संयुक्तरीत्या अग्रस्थानावर आहे.

# जेव्हा सचिन कवितांमध्ये रमतो...

**मुंबई : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने नुकतेच इन्स्टाग्रामवर कविता संग्रह वाचतानाचे फोटो शेअर केले आहेत. सचिन तेंडुलकर त्याचे दिवंगत वडील रमेश तेंडुलकर यांचे ’साहित्य’ हे पुस्तक वाचत होता. रमेश तेंडुलकर हे प्रसिद्ध कवी आणि कादंबरीकार होते. जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून सचिन तेंडुलकरने आपल्या वडिलांच्या पुस्तक वाचनाची ही पोस्ट शेअर केली. या पोस्टवर ७१ हजार लाईक मिळाले. या पोस्टला सचिन तेंडुलकरने ’माझे बाबा रमेश तेंडुलकर यांनी लिहिलेलं साहित्य हे पुस्तक. मिस यू बाबा.’ यानंतर सचिन तेंडुलकरने जागतिक पुस्तक दिनाचा हॅशटॅग वापरला होता.

# आशियाई कुस्ती स्पर्धेत अंशू, राधिकाला रौप्यपदके



**उलनबाटार : वृत्तसंस्था**

अंशू मलिकला आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या ५७ किलो वजनी गटात शुक्रवारी रौप्यपदक मिळाले. याचप्रमाणे राधिकाला (६५ किलो) रौप्य आणि मनीषाला (६२ किलो) कांस्यपदक मिळाले.

२० वर्षीय अंशूला अंतिम फेरीत जपानच्या त्सुगुमी साकुराईने चीतपट केले. त्याआधी, वर्चस्वपूर्ण कामगिरीच्या बळावर तिने तिन्ही लढती जिंकल्या. उझबेकिस्तानच्या शोखिदा अखमेडोव्हा आणि सिंगपूरच्या डॅनिले सू चिंग लिम यांना पहिल्या दोन लढतींत नामोहरम केले. मग उपांत्य लढतीत मंगोलियाच्या बोलोटुया खुरेलखूचा पराभव केला. राधिकाने कझाकस्तानच्या डारिगा अॅबेनविरुद्धच्या अंतिम लढतीत पराभव पत्करला, तर मनीषाचा कोरियाच्या हॅनबिट लीविरुद्धच्या लढतीत पराभव झाला. दरम्यान, ५३ किलो गटात स्वाती शिंदेने दोन्ही लढती गमावल्यामुळे पदकाच्या शर्यतीतून ती बाहेर पडली आहे.

# चहल ठरणार सर्वाधिक विकेट टेकिंग बॉलर- स्मिथ

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १५ हंगामातील ३४ वा सामना राजस्थान विरुद्ध दिल्ली त्याच्यात खेळला गेला. सामना सुरू होण्याअगोदर युजवेंद्र चहलबद्दल दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार ग्रॅम स्मिथने मोठे वक्तव्य केले आहे.

ग्रॅमी स्मिथला वाटते की, राजस्थान रॉयल्सचा लेग-स्पिनर युझवेंद्र चहलने २०१३ मध्ये ड्वेन ब्राव्हो आणि २०२१ मध्ये हर्षल पटेल यांचा आयपीएल हंगामात सर्वाधिक ३२ बळी घेण्याचा विक्रम मोडण्याची क्षमता आहे. चहलने हॅट्ट्रिकसह ५/४० विकेट्स घेतल्या आणि कोलकाता नाईट रायडर्सवर सात धावांनी विजय मिळवून दिला. चहल सध्या आयपीएल २०२२ मध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज आहे. त्याने ११.३३ च्या सरासरीने १८ विकेट्स घेतल्या आहे.

क्रिकेट डॉट कॉमने स्मिथच्या हवाल्याने म्हटले आहे की, चहल अविश्वसनीय गोलंदाजी करीत आहे. हंगाम जसजशी पुढे जाईल तसतसे त्याच्याकडून आणखी विकेट्स घेण्याची अपेक्षा आहे. त्याने आपला वेग चांगला वापरला आहे. मी त्याला चेंडू स्पिन करताना पाहिले आहे. रॉयल्सला पुढे नेण्याची त्याच्यात पूर्ण क्षमता आहे. एका हंगामात सर्वाधिक विकेट घेण्याचा ब्राव्होचा विक्रम तो मोडू शकतो. आयपीएल २०२२ विकेट घेणाऱ्यांच्या यादीत १४.३० च्या सरासरीने १० विकेट्स घेऊन सातव्या स्थानावर आहे.

# पॅरा-बॅडमिंटनपटू मानसीचा जागतिक युवा नेतृत्व गटात समावेश

**मुंबई : वृत्तसंस्था**

भारताची तारांकित पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी जोशीच्या कामगिरीची जागतिक आर्थिक मंचाने दखल घेतली असून तिचा जागतिक युवा नेतृत्व गटात समावेश करण्यात आला आहे. यंदा कला, क्रीडा, विज्ञान, व्यवसाय, शिक्षण क्षेत्रांतील १०९जणांना जागतिक युवा नेतृत्व या गटात समाविष्ट करण्यात आले. मानसी सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम पॅरा-बॅडमिंटनपटूंपैकी एक मानली जाते. २०१५साली व्यावसायिक कारकीर्दीला सुरुवात करणाऱ्या मानसीने गेल्या महिन्यात महिलांच्या एसएल-३ गटाच्या क्रमवारीत अग्रस्थानी झेप घेतली होती. तिने देशासाठी आतापर्यंत ३० हून अधिक पदके जिंकली आहे.



**पनवेल : देवळोली येथे श्री उसराई देवी वनभोजन उत्सवाला शनिवारी भाजप तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी सरपंच काजल मंगेश पाटील, माजी सरपंच डॉ. अनिवाश गाताडे, उमेश पाटील, संदीप पाटील, जि. प. विभाग गुळसुंदे युवा मोर्चा अध्यक्ष रोशन पाटील, यादव दिघे, मंगेश पाटील, योगेश पाटील, शमिल पाटील उपस्थित होते.**








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com